❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती शनिवार, दि. ३१ ऑक्टोबर २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : ३०५ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या यूट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

मोठ राजकीय भूकंप!

एकनाथ शिंदेंच्या नावावरून हालचाली; पण सध्याची राजकीय समीकरणे कन्फ्युज करणारी; संजय शिरसाटांचे सूचक वक्तव्य

■ छत्रपती संभाजीनगर (दै. संध्या)

विधानपरिषद निवडणुकीच्या निकालानंतर महायुतीमधील घटकपक्षांमध्ये जुंपली असतानाच, शिंदे सेनेचे नेते आणि राज्याचे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात आगामी काळात मोठ्या भूकंपाचे संकेत दिले आहेत. "येत्या 3 ते 4 महिन्यांत राज्यात प्रचंड मोठ्या घडामोडी घडणार असून राजकीय पटलावर मोठी उलथापालथ होण्याची शक्यता आहे. एकीकडे मुख्यमंत्री बदलाची चर्चा रंगते, तर दुसरीकडे एकनाथ शिंदेंचे नाव पुढे येते. ही सर्व समीकरणे सध्या अत्यंत कन्फ्युज करणारी आहेत. त्यामुळे नेमके काय घडेल हे खात्रीने सांगता येणार नाही; पण पडद्यामागे निश्चितच काहीतरी मोठे शिजत आहे," असा थेट आणि सूचक दावा संजय शिरसाट यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना केला आहे. भाजपचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांच्या विधानांवरून निर्माण झालेला तणाव, काल 29 ऑक्टोबर रोजी मुंबईत पार पडलेला अराजकीय कार्यक्रम आणि त्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह ठाकरे बंधूंची (उद्धव ठाकरे व राज ठाकरे) उपस्थिती या पार्श्वभूमीवर शिरसाट यांनी मांडलेली ही भूमिका सध्या राजकीय वर्तुळात प्रचंड चर्चेचा विषय ठरली आहे.



राज्यातील सध्याच्या राजकीय घडामोडींवर एका वृत्तवाहिनीशी बोलताना मंत्री संजय शिरसाट यांनी सविस्तर भाष्य केले. "आता नेमकं काय चालू आहे हे थेट सांगता येणार नाही. एकीकडे मुख्यमंत्री बदलाची भाषा सुरू होते, तर दुसरीकडे पुन्हा एकदा एकनाथ शिंदे यांचेच नाव पुढे केले जाते. ही सर्व समीकरणे सध्या संभ्रम निर्माण करणारी (कन्फ्युज करणारी) आहेत. त्यामुळे आत्ताच याविषयी खात्रीलायक काही सांगणे कठीण आहे." मुंबईत काल 29 ऑक्टोबर रोजी पार पडलेल्या एका पुस्तक प्रकाशन कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकाच मंचावर आले होते. या भेटीवर भाष्य करताना शिरसाट म्हणाले, "ठाकरे बंधू आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस एका मंचावर आले म्हणजे लगेच राज्यात काही नवी राजकीय समीकरणे उदयाला येतील, असे म्हणणे चुकीचे आहे. सार्वजनिक आणि कला क्षेत्रातील कार्यक्रमात नेते एकमेकांना भेटत असतात." "या भेटीमागे मूळ संशोधनाचा विषय काय असेल, तर भाजप नेते आशिष शेलार आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यामध्ये झालेला नेमका संवाद! त्या दोघांमध्ये काय चर्चा झाली, काही राजकीय रणनीती ठरली आहे का, हे तपासणे अधिक महत्त्वाचे आहे," असा थेट संशय त्यांनी व्यक्त केला. भाजप प्रवक्ते नवनाथ बन यांनी शिवसेना नेत्यांवर केलेल्या आक्रमक टीकेचा शिरसाट यांनी कडक शब्दांत समाचार घेतला.

"शिवसेना आणि भाजपमध्ये कोणताही उघड वाद किंवा धुसफूस नाही, महायुतीत सगळे ठीक आहे. मात्र भाजप प्रवक्ते नवनाथ बन यांनी स्वतःची पातळी पाहूनच विधाने करावीत. त्यांच्या अशा बेताल वक्तव्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची अधिकृत मान्यता आहे का, असा जाब आम्हीही विचारू शकतो. 2019 च्या निवडणुकीनंतर जे काही राजकारण घडले, त्यानंतर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आम्ही उठाव केला म्हणूनच आज भाजप पुन्हा सत्तेत आली आहे, याचे विस्मरण भाजपच्या नेत्यांनी होऊ देऊ नये."

उलथापालथ होण्याची दाट शक्यता

"सध्याच्या परिस्थितीवरून खात्रीने दावा करता येत नसला, तरी राजकारणातील जाणकार मंडळी ज्या पद्धतीचे संकेत देत आहेत, त्यावरून पडद्यामागे काही ना काही घडामोडी नक्कीच वेगाने सुरू आहेत. पुढील 3 ते 4 महिन्यांत राज्यात मोठी उलथापालथ होण्याची दाट शक्यता आहे. एकनाथ शिंदे हे सर्वसामान्यांचे नेते (कॉमन मॅन) आहेत. त्यामुळे येणारे वर्ष हे शिवसेनेचे असेल आणि एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाबाबत सुरू असलेल्या चर्चांकडे दुर्लक्ष करता येणार नाही."

थोडक्यात...



हेलिकॉप्टर क्रॅश; पायलट सह ६ प्रवाशांचा मृत्यू

चमोली : दैनिक संध्या

शुक्रवारी उत्तराखंडमधील जोशीमठजवळ बद्रीनाथहून डेहराडूनला जाणारे एक खासगी हेलिकॉप्टर कोसळले. या अपघातात पायलटसह सहा जणांचा मृत्यू झाला. सर्वांचे मृतदेह सापडले आहेत. हे हेलिकॉप्टर दुपारी सुमारे १:१४ वाजता बद्रीनाथहून डेहराडूनमधील सहस्रधारासाठी निघाले होते. जोशीमठ खोऱ्यावरून उडत असताना त्याचा संपर्क तुटला. त्यानंतर ट्रॅकिंग सिस्टीमने त्याचे स्थान गमावले. ही घटना अशा वेळी घडली, जेव्हा उत्तराखंडच्या अनेक भागांमध्ये पाऊस आणि बर्फवृष्टी होत असल्याने हवामान खराब होते. केंद्र सरकारच्या माहितीनुसार, 2016 ते 2026 दरम्यान उत्तराखंडमध्ये हेलिकॉप्टरच्या 12 दुर्घटना घडल्या, ज्यात 21 जणांचा मृत्यू झाला.

दोस्तीत कुस्ती नको!

मुंबई : दैनिक संध्या

"नैसर्गिक संकट किंवा आपत्तीच्या काळात केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर केरळचा पूर असो वा जम्मू-काश्मीरमधील अतिवृष्टी, नेहमीच सर्वात प्रथम धावून जाणारा पक्ष म्हणजे शिवसेना आहे. पक्ष आणि आमचे मुख्य नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे पूर्ण ताकदीने बळीराजाच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहेत. अशा संवेदनशील वातावरणात आमदार संजय गायकवाड यांनी शेतकऱ्यांविषयी केलेले बेताल वक्तव्य अत्यंत दुर्दैवी असून त्याचा करावा तेवढा निषेध कमी आहे. या वक्तव्याची गंभीर दखल पक्षश्रेष्ठींनी घेतली असून त्यांच्यावरील कारवाईचे स्पष्ट संकेत मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत," अशी स्पष्ट भूमिका शिवसेनेचे (शिंदे गट) नेते आनंद परांजपे यांनी मांडली आहे. मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना आनंद परांजपे यांनी दुष्काळग्रस्तांसाठी पक्षाने सुरू केलेली मदत मोहीम, विधानपरिषद निवडणुकीनंतर महायुतीमधील ताणतणाव आणि भाजप प्रवक्त्यांकडून मित्रपक्षावर होणाऱ्या भाषेच्या वापरावर संयमी परंतु सडेतोड शब्दांत पक्षाची भूमिका मांडली. आमदार संजय गायकवाड यांच्या वादग्रस्त विधानावर पक्षाची भूमिका स्पष्ट करताना आनंद परांजपे म्हणाले, "शेतकरी हा देशाचा आणि राज्याचा अन्नदाता आहे. शिवसेनेचा दसरा मेळावा यंदा पूर्णपणे बळीराजाला समर्पित करण्यात आला होता. अशा वेळी कोणत्याही लोकप्रतिनिधीने शेतकऱ्यांविषयी असंवेदनशील वक्तव्य करू नये, असे एकनाथ शिंदे यांचे कडक आदेश आहेत.

परीक्षा शुल्कावरून रोहित पवार विद्यार्थ्यांसाठी आक्रमक

सवलती कमी आणि अटी जास्त, सरकारने २ तारखेपूर्वी सरसकट निर्णय घ्यावा

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यभरातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा आणि शैक्षणिक शुल्क माफीच्या मुद्द्यावरून राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) आमदार रोहित पवार यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. राज्य सरकारने नुकताच परीक्षा शुल्क माफीचा निर्णय जाहीर केला असला, तरी त्यात सवलती कमी आणि जाचक अटीच जास्त असल्याची टीका रोहित पवार यांनी केली आहे. तसेच, येत्या २ तारखेपूर्वी सरकारने औदार्य दाखवून विनाअट सरसकट शुल्क माफीचा निर्णय घ्यावा, अशी जोरदार मागणी त्यांनी केली आहे. रोहित पवार यांनी पोस्ट करत विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर सरकारचे लक्ष वेधले आहे. विद्यार्थ्यांना दिलासा देण्यासाठी आपण सातत्याने पाठपुरावा करत असल्याचे सांगत रोहित पवार म्हणाले, "राज्यभरातील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफी आणि शैक्षणिक शुल्क माफी मिळावी, यासाठी आम्ही सातत्याने सरकारकडे पाठपुरावा करत आहोत. मात्र, सरकारकडून केवळ परीक्षा शुल्क माफीचा निर्णय घेण्यात आला; आणि त्यातही सवलती कमी आणि अटी जास्त, असाच प्रकार



झाला आहे." विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेत रोहित पवार यांनी सरकारसमोर आणि प्रशासनासमोर स्पष्ट मागण्या ठेवल्या आहेत : सरसकट माफी: कोणतीही अट न घालता सर्व विद्यार्थ्यांना सरसकट परीक्षा आणि शैक्षणिक शुल्क माफ करावे. मुदतवाढ: विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून परीक्षा फॉर्म भरण्याची मुदत वाढवण्यात यावी. शुल्क परतावा: ज्या विद्यार्थ्यांकडून आधीच अन्यायकारक पद्धतीने परीक्षा शुल्क आकारण्यात आले आहे, त्यांना ती रक्कम तत्काळ परत करण्यात यावी.

प्रतापगड, राजगडासह ४ किल्ल्यांवर कडक पहारा

महाराष्ट्रातील गडकिल्ले संवर्धनासाठी राज्य सरकारचा मोठा निर्णय

■ मुंबई (दै. संध्या)

राज्य सांस्कृतिक कार्य विभागाच्या 'वैभव संगमन योजने'अंतर्गत मिळालेल्या मान्यतेनुसार आरपीजी फाऊंडेशनने शिवडी किल्ला देखभालीसाठी दत्तक घेतला आहे. या योजनेंतर्गत किल्ल्यावर एक भव्य संग्रहालय आणि माहिती केंद्र उभारण्यात येणार आहे. या संग्रहालयाच्या माध्यमातून शिवडी किल्ल्याचा इतिहास, संस्कृती, पर्यावरण आणि मुंबईच्या सागरी वारशाशी असलेला त्याचा घनिष्ठ संबंध पर्यटकांसमोर उलगडण्यात येणार आहे.

राज्यातील गडकिल्ले आणि ऐतिहासिक वास्तूंच्या संवर्धनासाठी महायुती सरकारने एक मोठा निर्णय घेतला आहे. सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी केलेल्या घोषणेनुसार, आता गडकिल्ले आणि मंदिरांच्या संवर्धनासाठी जिल्हा नियोजन विकास समितीतून 3 टक्के निधी राखीव ठेवण्यात येणार आहे. या संवर्धन कामांसाठी राज्याच्या पुरातत्व विभागाकडून रीतसर तांत्रिक मान्यता दिली जाईल. राज्यातील युनेस्कोच्या यादीत असलेल्या चार प्रमुख किल्ल्यांची सुरक्षा अधिक भक्कम करण्यात येणार आहे. प्रतापगड, राजगड, साल्हेर आणि खांदेरी या किल्ल्यांवर घडणारे अनुचित प्रकार रोखण्यासाठी सुरक्षा रक्षक



नेमण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. यासाठी सुरक्षा रक्षक मंडळाचे एकूण 80 जवान तैनात केले जाणार असून, प्रत्येक किल्ल्यावर 19 सुरक्षा रक्षक आणि 1 पर्यवेक्षक अशी त्यांची नेमणूक असेल.

मुंबईतील ऐतिहासिक बाणगंगा तलाव परिसरातील वारसा जतन करण्याचे आणि या स्थळाचे ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्त्व लोकांपर्यंत पोहोचवण्याचे काम सध्या वेगाने सुरू आहे. या ऐतिहासिक वारसा जतन मोहिमेसोबतच स्थानिक महिलांच्या सक्षमीकरणावरही भर देण्यात आला असून, 150 हून अधिक महिलांना उद्योजकता, शिलाईकाम आणि आरोग्य यांसारख्या विषयांचे विशेष प्रशिक्षण देण्यात आले आहे. विविध सांस्कृतिक कार्यक्रम आणि उपक्रमांच्या माध्यमातून आतापर्यंत 500 हून अधिक पर्यटकांना या ऐतिहासिक वारसा स्थळांशी जोडण्यात आले आहे. याच धर्तीवर वरळी किल्ला आणि वरळी कोळीवाडा येथेही सुशोभीकरणाची कामे राबवली जात आहेत. वरळी कोळीवाड्यात आतापर्यंत 71 पेक्षा जास्त पथदिवे, 30 पेक्षा जास्त माहिती फलक आणि सातपेक्षा अधिक आकर्षक सार्वजनिक भित्तिचित्रे बसवण्यात आली आहेत.

महायुती टिकवायची असेल तर झारीतले शुक्राचार्य रोखा

भाजपचा शिवसेनेला इशारा; १२ पक्ष फिरून आलेल्या धंगेकरांनी फडणवीसांवर बोलू नये!

■ मुंबई (दै. संध्या)

महायुतीविरोधात काम करणारे रवींद्र धंगेकर अब्दुल सत्तार यांच्यावर कारवाई करा, महायुती टिकवायची असेल तर झारीतले शुक्राचार्य रोखा, असा खणखणीत इशारा भाजपने आज शिवसेनेला दिला. भाजपचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी आज पत्रकार परिषद घेत शिवसेनेचे रवींद्र धंगेकर यांचा माकडछाप म्हणून उल्लेख केला. नवनाथ बन यांनी काल भूमिका मांडल्यानंतर त्यांच्या समर्थनार्थ प्रवीण दरेकरांसह भाजपचे इतर नेते मैदानात उतरले. आज पुन्हा विधान परिषद निवडणूक निकालावरून महायुतीमध्ये जोरदार जुंपली आहे.

"ज्यांनी राजकीय कारकिर्दीसाठी 12 पक्ष फिरले, ज्यांच्या घरातील लोकांचे पुणे महापालिकेत डिपॉझिट जप्त झाले आणि ज्यांना पुणेकरांनी लोकसभा व विधानसभेत घरी बसवले, त्या 'माकडछाप' व्यक्तीने देवेंद्र फडणवीस आणि भाजपवर बोलण्याची लायकी नाही. महायुतीत राहून पुण्यात भाजप उमेदवार स्मिता जाधव यांच्याविरोधात अधिकृत सोशल मीडिया पेजवरून प्रचार करणाऱ्या रवींद्र धंगेकरांवर आणि छत्रपती



संभाजीनगरमध्ये उघडपणे बंडखोरी करणाऱ्या अब्दुल सत्तारांवर शिवसेना काय कारवाई करणार? अमरावतीत बंडखोरांवर भाजपने ६ वर्षांसाठी निलंबनाची कुऱ्हाड चालवली, मग शिवसेनेनेही धंगेकर आणि सत्तारांवर तशीच कठोर कारवाई करून युतीधर्म पाळावा,"असा सणसणीत आणि थेट सवाल भारतीय जनता पक्षाचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी उपस्थित केला आहे. मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत नवनाथ बन यांनी विधानपरिषद निकालांनंतर मित्रपक्षाकडून सुरू असलेली अंतर्गत चिखलफेक, रवींद्र धंगेकर व अब्दुल सत्तार यांची वक्तव्ये, संजय राऊतांचे '1 एप्रिल'चे भाकीत, ठाण्यातील प्रदीप पूर्णेकर हत्या प्रकरण आणि शिवसेनेच्या अस्मितेवरून सुरू असलेल्या वादावर आक्रमकपणे पक्षाची भूमिका मांडली. रवींद्र धंगेकर यांच्या विधानांवर घणाघात करताना नवनाथ बन म्हणाले, "ज्यांना एका पक्षात आपले राजकीय करिअर घडवता आले नाही, जे मनसे, काँग्रेस, शिवसेना करत 12 घरे फिरून आले, त्या माकडछाप व्यक्तीची अवस्था 'माकडाच्या हाती कोलीत' अशी झाली आहे. ज्यांना स्वतःच्या कुटुंबातील दोघांचे डिपॉझिट महापालिकेत वाचवता आले नाही, ते आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वावर टीका करत आहेत." "आम्ही अभाविप पासून काम करत, पत्रकारिता करून भाजपचे कमळ हातात घेतले आहे. धंगेकरांसारखे 12 चिन्ह आणि 12 पक्ष बदलून स्वार्थासाठी उड्या मारणारा मी कार्यकर्ता नाही. त्यामुळे अशा उथळ नेत्याला फार महत्त्व देण्याची गरज नाही."

राज्याचे नेतृत्व बदलून एकनाथ शिंदेंकडे द्या

शिवसेनेचे रवींद्र धंगेकर यांची मागणी; म्हणाले- भविष्यात शिंदे-ठाकरे एकत्र येऊ शकतात

■ मुंबई/पुणे (दै. संध्या)

विधान परिषद निवडणुकीतील महायुतीच्या कामगिरीनंतर राज्यातील राजकीय वातावरण तापलं आहे. या निकालाला राज्याच्या नेतृत्वाचा पराभव असल्याचे सांगत, राज्याचे नेतृत्व बदलून ते पुन्हा एकदा एकनाथ शिंदे यांच्याकडे दिले पाहिजे, या आपल्या मागणीचा शिवसेना नेते रवींद्र धंगेकर यांनी पुनरुच्चार केला आहे. यासोबतच, शिवसेनेवर युतीधर्म न पाळल्याचा आरोप करणारे भाजप प्रवक्ते नवनाथ बन यांच्यावरही त्यांनी 'ते पगारी माणूस आहेत, त्यांचे काय ऐकता?' अशी टीका केली आहे. या निवडणुकांच्या निकालाचे विश्लेषण करताना धंगेकर यांनी राज्यातील सध्याच्या नेतृत्वावर अप्रत्यक्षरीत्या निशाणा साधला. "पदवीधर आणि शिक्षक मतदार हे उच्च पदावर काम करणारे असतात. राज्याचा तोल कुठल्या बाजूला झुकलाय, हे त्यांना जास्त चांगले समजते. या निवडणुकीत राज्याच्या नेतृत्वाचा कस लागलेला असतो, आणि तो लागलेला दिसत नाही. त्यामुळे हा थेट राज्याच्या नेतृत्वाचा पराभव आहे," असे ते म्हणाले. राज्याचे नेतृत्व बदलले पाहिजे. तीन पक्षांच्या महायुतीत एकनाथ शिंदे यांनी ज्या पार्श्वभूमीवर २०० पेक्षा जास्त आमदार निवडून आणलेत, ते पाहता नेतृत्व पुन्हा एकनाथ शिंदे यांच्याकडेच दिले पाहिजे. जनतेची नाळ त्यांच्यासोबत जोडलेली आहे."



धंगेकर म्हणाले, नवनाथ बन हा पगारी माणूस आहे राव, त्याचे काय ऐकता तुम्ही? त्याचे ऐकू नका," असा टोला त्यांनी लगावला. आगामी काळातील परिस्थितीबाबत चिंता व्यक्त करताना ते पुढे म्हणाले, "आज महाराष्ट्र दुष्काळाच्या खाईत लोटला गेला आहे, शेतकऱ्यांचे प्रश्न प्रचंड आहेत, गरिबी वाढली आहे आणि पुणे शहराला पाणी नाही. अशा परिस्थितीत जर एकनाथ शिंदे यांच्याकडे नेतृत्व दिले, तरच महाराष्ट्राची परिस्थिती अत्यंत चांगली होईल. दरम्यान, नुकत्याच एका कार्यक्रमाच्या निमित्ताने मनसे अध्यक्ष राज ठाकरे, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस एकाच मंचावर आल्याने राजकीय वर्तुळात मोठ्या चर्चांना उधाण आले आहे. या तिन्ही नेत्यांमधील चर्चेनंतर आता शिवसेना (शिंदे गट) नेते रवींद्र धंगेकर यांनी एक अतिशय मोठा दावा केला आहे.

संपादकीय

शोध पत्रकारितेवर गदा?

भ्रष्टाचाराची चौकशी, किंवा शोध - पत्रकारिता करताना,बातमी प्रसिद्ध करण्यापूर्वी, पत्रकारांना त्या व्यक्तीची पूर्वसंमती घ्यावी लागणार आहे, या केंद्र सरकारच्या कायद्यावर डिजिटल वृत्तसंस्थांनी आक्षेप नोंदवलेला आहे. सध्याच्या डिजिटल युगात व्हाट्सअँप वर पाठवलेला प्रत्येक खाजगी संदेश, कुटुंबीय संवाद, किंवा राजकीय धोरणावर व्यक्त केलेले मत सुरक्षित राहील असा सर्वसामान्य नागरिकांचा विश्वास असतो, मात्र २५ फेब्रुवारी २०२६ रोजी केंद्र सरकारने आणलेल्या माहिती तंत्रज्ञान विषयक नव्या नियमामुळे (विशेषतः नियम क्रमांक. ४(२)) या अन्वये या विश्वासाला तडे गेलेले आहेत. या नियमानुसार मोठ्या संदेशवहन मंचांना एखाद्या संदेशाचा मूळ उगम शोधण्याची सक्ती करण्यात आलेली आहे, याप्रकरणी व्हाट्सअपने दिल्ली उच्च न्यायालयात कायदेशीर लढा पुकारला असून या कुटील निर्णयाशी तडजोड करावी लागल्यास लागल्यास भारतातील सेवा बंद करण्याचा गंभीर इशारा दिला आहे, हा केवळ तांत्रिक, किंवा कायदेशीर मुद्दा नसून यामागे राष्ट्रवादाच्या नावाखाली राजकीय हितसंबंध जपण्याचा छुपा अजेडा दडलेला आहे काय?...हा खरा कळीचा सवाल आहे, गेल्या काही वर्षात सत्ताधाऱ्यांनी प्रत्येक गंभीर मुद्द्यावर राष्ट्रीय सुरक्षा आणि देशभक्ती चे वर्मी भावनिक लेबल वापरून व पांघरून विरोधक, स्वतंत्र पत्रकार, आणि असंतुष्टांचा आवाज दाबण्याचा व दडपण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते, व तो सद्या अजूनही केला जात आहे, बनावट बातम्या, धार्मिक तेढ, हिंसाचाराला चिथावणी, किंवा राष्ट्रीय सुरक्षेला धोका, यासारख्या गंभीर गुन्ह्याचा तपास करणे ही सरकारची जबाबदारी आहेच, यात कुणाचे दुमत असण्याचे कारण नाही, परंतु मोजक्या गुन्हेगारांचा शोध घेण्याच्या बहाण्याने देशातील कोट्यवधी सामान्य नागरिकांच्या खाजगी संवादावर पाळत ठेवण्याची यंत्रणा उभी करणे, हे लोकशाहीच्या मुळावर घाव घालणारे आहे, जेव्हा जेव्हा सरकार नागरिकांच्या अधिकारावर गदा आणते, तेव्हा तेव्हा देश प्रेमाचा बडगा उभारून विरोध मोडून काढला जातो,हा राष्ट्रवादाचा अतिरेक नसून, राजकीय नियंत्रण प्रस्थापित करण्याचा सुप्त डाव आहे, भारतीय सर्वोच्च न्यायालयाने २०१७ मधील ऐतिहासिक के. एस. पट्टस्वामी निकालात गोपनियतेचा अधिकार हा भारतीय संविधानाच्या कलम २१ अंतर्गत मूलभूत अधिकार असल्याचे स्पष्ट केले आहे, असे असतानाही २०२४ च्या सुनावणी दरम्यान दिल्ली उच्च न्यायालयाचे पुढे आलेले संकेत, आणि सरकारच्या विधानावरून असे स्पष्ट होते,की गोपनेतेच्या अधिकाराला मर्यादा घालण्याचे प्रयत्न पद्धतशीरपणे सुरू झालेले आहेत, एप्रिलमध्ये झालेल्या सुनावणीत न्यायालयाने पुढील सुनावणी निश्चित केली असली तरी या प्रकरणातील कायदेशीर पेच अद्याप सुटलेला नाही, सुरक्षेच्या नावाखाली प्रत्येकाला संशयीत मानण्याची ही मानसिकता लोकशाहीच्या आरोग्यासाठी घातक आहे, या कायद्यामुळे प्रश्न उपस्थित होतो की गुन्हेगारांना पकडण्यासाठी कायद्याने ठरवलेल्या मर्यादित आणि प्रभावी तपास यंत्रणांचा वापर करण्याऐवजी संपूर्ण नागरिकांची डिजिटल स्पेस असुरक्षित करणे कितपत योग्य आहे?..... व्हाट्सअपने केवळ भारत सोडण्याची धमकी देण्याऐवजी कायदेशीर तपासाला सहकार्य करतानाच नागरिकाच्या गोपनियतेचे रक्षण करून समतोल साधला जाईल, याचे व्यवहारिक मार्ग दाखवणे गरजेचे आहे, मात्र या सगळ्या वादात राजकारण्यांना हवी असलेली सेन्सारशीप आणि नियंत्रण यंत्रणा सुलभतेने मिळताना दिसत आहे. कायद्याचा बडगा हवा, पण त्यामागे राजकीय स्वार्थ साधण्यासाठी कोट्यवधी नागरिकांच्या खाजगी पणाचा घात होणे थांबवले पाहिजे, सुरुवातीला समाज माध्यमात पेरलेल्या भाकडकथा जोवर आपल्या राजकीय फायद्याच्या होत्या, तोवर या विद्यमान सरकारला माहितीचा प्रसार, व प्रचार, हे दोन्ही हवेहवेसे वाटत होते, कालांतराने तेच राज्यकर्त्यासाठी दुधारी शस्त्र ठरले, असे जाणवू लागल्यानंतर तात्कालीन मुख्य माहिती स्तोत्रावर मालकी हक्क प्रस्थापित केल्यावरही, राज्यकर्त्याच्या हितास स्मारक अशा माहितीचे नवनवीन स्रोत निर्माण झाले, व फोफावत चालले,आणि त्यावर नियंत्रण आणण्याचे प्रयत्न सरकार दरबारी सुरू झाले, आणि माहितीच्या अधिकारावर टप्प्याटप्प्याने गदा आली. "फॅक्ट चेक युनिट "स्थापनेचा प्रयत्न देखील याचाच एक भाग होता. पण लोकशाहीच्या सुदैवाने उच्च न्यायालयाने ते असंवैधानिक ठरवून रद्द केले. आता माहितीचे वादळ निवडणूक आयोग, मित्र, उद्योगपती, आणि सर्वोच्च न्यायालयावर घोंगावू लागले आहे. केंद्र सरकारचा डीपीडीपी कायदा हा माहितीच्या वादळाला आळा घालण्याचा प्रयत्न करत आहे. माहिती बंद, टीका बंद,!...डीपीडीपी कायद्याखाली दंडाची अडीचशे कोटी रुपये एवढी रक्कम पाहता माहितीचा ब्रह्मराक्षस सरकारच्या मागे किती हात घेऊन लागला आहे हे यावरून स्पष्ट होते. परंतु माहिती अडवली तर ती जास्त जिरते, पाण्यासारखी वाट मिळेल तिथे पसरते. माहिती दाबली तर ती कानोकानी जाताना त्यात आणखी भर पडते, गैरसमज वाटतात. झाकले की बघण्याचा मोह वाढतो?..डिजिटल माध्यमांना दहा तोंडे असतात. सरकार कोणाकोणाला तोंड दाबून मुक्याचा मार देणार?.. अनेक वर्षे विरोधी पक्षात घालवलेल्या भाजपला डीपीडीपी सारखा कायदा केला तर काय परिणाम होतो?...हे माहीत असणे अपेक्षित होते. आजचा सरकारी पक्ष उद्याचा विरोधी पक्ष होऊ शकतो?... हे ध्यानात ठेवून विद्यमान सत्ताधाऱ्यांनी जपून पावले टाकावीत. लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणवणाऱ्या आपल्या देशातील बहुतांश इलेक्ट्रिक, आणि मुद्रित माध्यमांना, विविध मार्गाने स्वतच्या नियंत्रणात ठेवण्याचा प्रयत्न सरकार करताना दिसत आहे. मुख्य प्रवाहातील अनेक माध्यमांना त्यांची भूमिका प्रामाणिकपणे बजावण्यात अडथळे येताना दिसतात. त्यामुळेच अनेकांनी पत्रकारितेसाठी नवीन मंच शोधले आहेत. आता या मंचावरील आशयही आपल्या नियंत्रणात असावा यासाठी सरकार धडपडत आहे,धोरण करणारे, घटनात्मक संस्थांना, आणि त्यांच्या प्रमुखांना हाताशी धरून स्वतःला हवे तेच साधून घेत आहेत. हे करताना नैतिकतेलादेखील कात्री लावत आहेत. अलीकडे प्रसार माध्यमावर उद्योगपतींचे वर्चस्व वाढू लागले असताना सरकारचा डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन कायदा (डी पी डी पी) लोकशाही व्यवस्था खिळखिळी करण्याचा प्रयत्न आहे. लोकशाही व्यवस्था मजबूत करणाऱ्या संस्थांचे अधिकार कमी करण्याचे काम सरकारच्या वतीने सुरू आहे. २०१४ मध्ये मोदी सरकार सत्तेत आल्यानंतर ९९ वी घटनादुरुस्ती करून राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोगाच्या माध्यमातून न्यायाधीशाच्या निवड प्रक्रियेत बदल करण्याचा प्रयत्न केला गेला. संविधानाने न्यायव्यवस्थेला दिलेल्या अधिकाराचे उल्लंघन करण्याचा प्रयत्न सरकारने केला. परंतु न्यायव्यवस्थेने ही घटना दुरुस्ती रद्द करून सरकारचे प्रयत्न हाणून पाडले. निवडणूक आयोगाच्या बाबतीत तेच झाले २०२३च्या कायद्याने निवडणूक आयुक्ताच्या निवड समितीमध्ये सर सरन्याधिशाचे ऐवजी केंद्रीय कॅबिनेट मंत्र्याचा समावेश केला, म्हणजेच हे सरकार आपल्या सोयीने वाटेल ते बदल करण्याचा प्रयत्न करत दिसत आहे. हे लोकशाही व्यवस्थेच्या दृष्टीने धोकादायक आहे. राष्ट्रीय सुरक्षा अत्यंत महत्त्वाची आहे. पण तिच्या रक्षणासाठी नागरिकांच्या वैयक्तिक स्वातंत्र्याची आहुती देणे योग्य आहे काय?...देशभक्तीचा बेगडी बुरखा पांघरून हुकूमशाहीच्या दिशेने जाणारी पाऊले रोखणे, ही प्रत्येक सुजाण नागरिकाची जबाबदारी आहे. गुन्हेगारांना वठणीवर आणण्यासाठी कायद्याचा बडगा हवा, पण त्या मागे राजकीय स्वार्थ साधण्यासाठी व सत्ता अबाधित ठेवण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांच्या हक्कावर गदा आणणे थांबवलेच पाहिजे.

मळदच्या अभयसिंह घाडगे यांनी केले दर्जेदार ऊसाचे उत्पादन

३८ ते ४० कांडीचा पूर्ण वाढलेला ऊस

■ मळद (बारामती) (दै. संध्या)

बारामती तालुक्यातील माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील अभयसिंह राजेंद्र घाडगे यांनी आपल्या मळद गावातील ऊसाच्या शेतात यंदा दुष्काळी परिस्थिती असताना आणि पाण्याची तीव्र टंचाई असताना अंत्यत दर्जेदार उत्तम प्रतीचे उसाचे उत्पादन घेतले आहे. या दर्जेदार ऊसाची पाहणी करण्यासाठी माळेगाव सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष नितीनदादा शेंडे यांनी अभयसिंह घाडगे यांच्या शेतात असणाऱ्या शेतकऱ्याच्या उसाच्या फडात जाऊन केली ऊस तोडणी करताना प्रत्यक्ष पाहणी केली.आणि दर्जेदार ऊस पिक उत्पादन करून आणल्याबद्दल माळेगाव साखर कारखान्याचे सभासदाचे मनापासून कौतुक केले. बारामती तालुक्यातील माळेगाव कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील मळद गावातील युवा शेतकरी अभयसिंह राजेंद्र घाडगे यांच्या उसाची तोडणी सध्या सुरू असून त्यांच्या शेतात माळेगाव कारखान्याचे उपाध्यक्ष नितीनकुमार शेंडे आणि कारखान्याचे ओव्हरसीयस अनिल जगताप,चीट बॉय श्रीकांत जगताप यांनी प्रत्यक्ष ऊस तोडणीची पाहणी केली.यावेळी



अभयसिंह घाडगे यांनी खरोखरच दर्जेदार प्रतीचे ऊस उत्पादन केले आहे.साधारणपणे बैलगाडीचे वजन साडेचार टनापर्यंत आले आहे,सध्याच्या चालू असणाऱ्या दुष्काळी परिस्थितीत सुद्धा इतके चांगले पीक आणल्याबद्दल ऊस उत्पादक अभयसिंह घाडगे यांचे सर्वांनीच कौतुक केले.यावेळी सभासद राजेंद्र घाडगे व दिलीप घाडगे यांनी सांगितले की,"माळेगाव कारखान्याचे उपाध्यक्ष नितीनदादा शेंडे यांनी प्रत्यक्ष आमच्या शेताला भेट दिली आणि आमचे या ऊस उत्पादनाबाबत मनापासून केलेलं कौतुक हे आमच्या साठी प्रेरणादायी आहे," आम्ही कष्टानी पीकविलेला ऊस हाच आमच्यासाठी मोठा सत्कार आहे. यावेळी प्रगतशील बागायतदार आत्माराम तात्या गावडे,नानासो गावडे,चारुदत्त गावडे हे सुद्धा उपस्थित होते.

फटाके विक्रीसाठी परवानगी आवश्यक; अर्ज करण्याचे आवाहन

■ बारामती (दै. संध्या)

■ परवान्यासाठी ६०० रुपये शुल्क

आगामी दिवाळी सण २०२६ च्या पार्श्वभूमीवर बारामती उपविभागात शोभेची दारू व फटाके विक्री करण्यासाठी इच्छुक व्यावसायिकांना उपविभागीय दंडाधिकारी कार्यालयाकडून परवाना घेणे आवश्यक आहे. यासाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत २ नोव्हेंबर २०२६ निश्चित करण्यात आली आहे. मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही, असे उपविभागीय अधिकारी उत्तम दिघे यांनी कळविले आहे. फटाके विक्रीचा परवाना मिळविण्यासाठी अर्जदारांनी आवश्यक कागदपत्रांसह उपविभागीय दंडाधिकारी, बारामती उपविभाग यांच्या कार्यालयात विहित मुदतीत अर्ज सादर करावेत. अर्जासोबत १० रुपयांचे कोर्ट फी स्टॅम्प लावणे आवश्यक आहे. तसेच ज्या जागेत व्यवसाय करायचा आहे त्या जागेच्या मालकी हक्काचा उतारा किंवा जागा भाड्याने घेतली असल्यास मालकाचे संमतीपत्र सादर करावे. जागेच्या सुरक्षिततेबाबत १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर नोटरी केलेले प्रतिज्ञापत्रही जोडणे आवश्यक आहे. याशिवाय पोलीस निरीक्षक किंवा उपनिरीक्षक यांच्याकडून फटाके विक्रीच्या सुरक्षिततेबाबतचे प्रमाणपत्र, अर्जदारास शिक्षा झाली नसल्याबाबतचे प्रमाणपत्र, ना-हरकत प्रमाणपत्र तसेच दुकानाची जागा सुरक्षित असल्याबाबत आणि उर्वरित मालाची विल्हेवाट लावण्यासंदर्भात विस्फोटक नियम २००८ व विस्फोटक कायदा १८८४ मधील तरतुदींचे पालन करण्याबाबतचे प्रतिज्ञापत्र सादर करावे लागणार आहे. ग्रामपंचायत किंवा नगरपालिकेचे ना-हरकत प्रमाणपत्र, नगरपालिका हद्दीतील दुकानासाठी जागा दिल्याच्या पत्राची प्रत आणि मागील वर्षीच्या परवान्याची झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक आहे. परवाना शुल्कापोटी ६०० रुपये शासकीय कोषागारात जमा करून त्याचे मूळ चलन अर्जासोबत जोडावे.

सुनेत्रा पवार यांच्या पुढाकारातून सिंचन योजनेला बळ

जानाई-शिरसाईसाठी ८०० एमसीएफटी पाणी मंजूर! ;२ नोव्हेंबरपासून वरवंड,शिर्सुफळ तलावांत पाणी सोडणार

■ बारामती (दै. संध्या)



दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतीच्या पाण्याचा प्रश्न ऐरणीवर असतानाच जानाई-शिरसाई उपसा सिंचन योजनेबाबत महत्त्वाची घडामोड घडली आहे.या योजनेसाठी ८०० एमसीएफटी पाणी उपलब्ध करून देण्यास मान्यता मिळाल्याने बारामती तालुक्यातील संबंधित भागांना सिंचनासाठी पाणी मिळण्याचा मार्ग सुकर झाला आहे.येत्या २ नोव्हेंबरपासून वरवंड आणि शिर्सुफळ तलावांत पाणी सोडण्यात येणार असल्याने शेतकऱ्यांच्या आशा उंचावल्या आहेत.पुणे येथील विधान भवनात उपमुख्यमंत्री सुनेत्रावहिनी पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत हा निर्णय झाला. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील,कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्यासह जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी या बैठकीला उपस्थित होते.जानाई-शिरसाई उपसा सिंचन योजनेच्या माध्यमातून शेतीला पाणी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने बैठकीत चर्चा करण्यात आली.त्यानंतर धरणाच्या मुखाशी ८०० एमसीएफटी पाणी उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली.या निर्णयानुसार २ नोव्हेंबर २०२६ पासून वरवंड व शिर्सुफळ तलावांत पाणी सोडण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे.योजना पूर्ण क्षमतेने चालविण्यासाठी आवश्यक तांत्रिक व प्रशासकीय नियोजन करण्यावरही बैठकीत भर देण्यात आला.यासंदर्भात उपसा सिंचन विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांशी चर्चा झाली.उपलब्ध पाण्याचा योग्य वापर करून साधारणतः ३० ते ३५ दिवस योजना सुरू ठेवण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. पावसाच्या अनिश्चिततेमुळे सिंचनासाठी पर्यायी पाणीस्रोतांचे नियोजन महत्त्वाचे ठरते. अशा परिस्थितीत जानाई-शिरसाई योजनेसाठी पाणी उपलब्ध होण्याचा निर्णय संबंधित भागातील शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा आहे.तलावांमध्ये पाणी पोहोचल्यानंतर त्याचे वितरण कशा पद्धतीने होते आणि उपलब्ध साठ्याचा किती प्रभावी वापर केला जातो यावर प्रत्यक्ष सिंचनाचा लाभ अवलंबून राहणार आहे.या निर्णयामुळे शेतीच्या पाण्याबाबत अपेक्षा वाढल्या असून आता निर्धारित तारखेला पाणी सोडण्याच्या कार्यवाहीकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

कामादरम्यान मातीचा ढिगारा कोसळला

■ एकाचा मृत्यू, एक जखमी

■ उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्याकडून दुर्घटनेबाबत दुःख व्यक्त; चौकशीचे निर्देश

■ प्रशासनाकडून तातडीने बचाव व मदतकार्य

■ इंदापूर (दै. संध्या)



तालुक्यातील मौजे राजवडी येथे पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील उड्डाणपुलाजवळ साईडपट्टीच्या भरावाचे काम सुरू असताना माती-मुरुमाचा ढिगारा कोसळून झालेल्या दुर्घटनेत एका मजुराचा मृत्यू झाला असून, एक मजूर जखमी झाला आहे. जखमी मजुराला तातडीने बाहेर काढून इंदापूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्याची प्रकृती स्थिर आहे. या दुर्घटनेबाबत उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दुःख व्यक्त केले असून, घटनेची चौकशी करण्याचे निर्देश दिले आहेत. शुक्रवार दि. ३० ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी सुमारे १० वाजण्याच्या सुमारास ही दुर्घटना घडली. उड्डाणपुलाजवळ साईडपट्टीच्या भरावाचे काम सुरू असताना अचानक माती-मुरुमाचा ढिगारा कोसळला. त्यावेळी घटनास्थळी तीन मजूर काम करीत होते. त्यापैकी एका मजुराने प्रसंगावधान राखून स्वतःची सुटका करून घेतली. उर्वरित दोन मजुरांपैकी एकाला सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले, तर एका मजुराचा ढिगाऱ्याखाली दबून मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, पोलीस आणि महसूल विभागाच्या पथकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. बचाव व मदतकार्य हाती घेऊन जखमी मजुराला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रशासनाकडून घटनेच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

बारामती येथे शुक्रवारी विभागीय डाकअदालत

■ बारामती (दै. संध्या)

बारामती विभाग अंतर्गत येणाऱ्या बारामती पुरंदर शिरूर दौंड आणि इंदापूर तालुक्यातील संबंधित पोस्ट ऑफिसच्या कार्यपद्धती विषयी तक्रारींचे निवारण करण्यासाठी शुक्रवार दिनांक ६ नोव्हेंबर २०२६ रोजी अधीक्षक, डाकघर बारामती येथे दुपारी ३ वाजता डाक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

पोस्टाची सेवा ही देशाच्या सामाजिक व आर्थिक जीवनाचा एक अभिन्न भाग आहे. देशातील प्रत्येक नागरिकांच्या मनामध्ये अपरोक्षपणे पोस्टाच्या सेवेने एक वेगळ्या प्रकारचे स्थान निर्माण करून प्रभावित केले आहे. पोस्ट खाते हे लोकांना चांगल्या प्रकारची सेवा देण्याचा व ग्राहकांचे जास्तीत जास्त समाधान करण्याचे प्रयत्न करते. ही सेवा देतांना, संभाषणामध्ये, पत्रव्यवहारामध्ये किंवा सेवेमधील काही त्रुटीमुळे असे काही प्रसंग निर्माण होतात की त्यामुळे पोस्टाच्या सेवेबद्धल तक्रार करण्याची वेळ येते. या तक्रारींचा योग्य प्रकारे न्याय निवाडा करण्यासाठी पोस्ट खात्याने वेळोवेळी डाक अदालत घेण्याचे ठरविले आहे. त्यामध्ये पोस्ट विभागाचे अधिकारी तक्रार विनाविलंब सोडविण्याचा प्रयत्न करण्यात येतो. डाक अदालतमध्ये पोस्ट ऑफिसच्या कार्यपद्धती विषयी किंवा कामकाजाबद्दल ज्या तक्रारींचे निवारण सहा आठवड्यांच्या आत झालेले नसेल व समाधान कारक उत्तर मिळाले नसेल अशा तक्रारींची या डाक अदालतमध्ये दखल घेतली जाईल. विशेषतः टपाल, स्पीड पोस्ट, काऊंटर सेवा, डाक वस्तु, पार्सल, बचत बँक व मनिऑर्डर बाबतच्या, तक्रारी विचारात घेतल्या जातील, तक्रारींचा उल्लेख सर्व तपशीलासह केलेला असावा उदा. तारीख व ज्या अधिकाऱ्यास मूळ तक्रार पाठवीली असेल त्याचे नांव व हुद्दा इत्यादी माहिती सोबत ठेवावी.

वायू प्रदूषण रोखण्यासाठी भिवंडी महापालिका ॲक्शन मोडवर!

GRAP अंतर्गत तीन टप्प्यांत कारवाई; नियमभंग करणारे बांधकाम व्यावसायिक, कंत्राटदार आणि दोषींवर दंडात्मक कारवाईचा इशारा

■ भिवंडी(दै. संध्या)

- उघड्यावर कचरा किंवा बांधकाम साहित्य जाळू नये.
- बांधकाम व पाडकामाच्या ठिकाणी धूळ नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात.
- बांधकामाचा मलबा केवळ अधिकृत ठिकाणीच टाकावा.
- बांधकाम साहित्य आणि मलब्याची वाहतूक करताना वाहने व्यवस्थित झाकावीत.
- रस्ते, सार्वजनिक जागा आणि मोकळ्या भूखंडांवर कचरा टाकू नये.
- महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या सूचना व नोटिसांचे निर्धारित मुदतीत पालन करावे.

भिवंडी शहरातील वाढत्या वायू प्रदूषणावर नियंत्रण मिळविण्यासाठी भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेने कठोर पावले उचलण्याचा निर्णय घेतला आहे. नागरिकांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी आणि शहरातील हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी महानगरपालिकेमार्फत Graded Response Action Plan (GRAP) अंतर्गत तीन टप्प्यांत प्रदूषण नियंत्रणाच्या उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. नियमांचे उल्लंघन करणारे बांधकाम व्यावसायिक, विकासक, कंत्राटदार, मालमत्ताधारक आणि संबंधित दोषींवर टप्प्याटप्प्याने कारवाई केली जाणार असल्याची माहिती महानगरपालिकेने दिली आहे. शहरातील बांधकाम व पाडकाम स्थळांवरून निर्माण होणारी धूळ, बांधकाम साहित्याची अयोग्य हाताळणी, रस्त्यांवरील धूळ, बांधकामाचा मलबा आणि कचऱ्याची अनधिकृत विल्हेवाट तसेच उघड्यावर कचरा जाळण्याच्या प्रकारांवर महापालिका विशेष लक्ष ठेवणार आहे. प्रथमच नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधित व्यक्ती किंवा बांधकाम व्यावसायिकाला लेखी नोटीस बजावून ठरावीक मुदतीत त्रुटी दूर करण्याचे निर्देश दिले जातील. बांधकामस्थळी हिरव्या जाळ्या लावणे, वाऱ्यापासून संरक्षणात्मक अडथळे उभारणे आणि नियमित पाण्याची फवारणी करणे यांसारख्या धूळ नियंत्रणाच्या उपाययोजना बंधनकारक असतील. नोटीस देऊनही निर्धारित मुदतीत सुधारणा न केल्यास किंवा पुन्हा नियमभंग केल्यास संबंधितांवर लागू नियमांनुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल. आवश्यकतेनुसार धूळ निर्माण करणारे उत्खनन अथवा पाडकाम थांबविण्याची नोटीस दिली जाईल. तसेच महापालिकेमार्फत कचरा हटविण्यासाठी झालेला खर्च संबंधित दोषी व्यक्तीकडून वसूल करण्यात येणार आहे. वारंवार नियमांचे उल्लंघन करणे, गंभीर स्वरूपाचे प्रदूषण निर्माण करणे, उघड्यावर कचरा जाळणे किंवा मोठ्या प्रमाणात अनधिकृत कचरा टाकणे अशा गंभीर प्रकरणांमध्ये काम बंद करण्याची कार्यवाही, परवानगी निलंबित करण्याची शिफारस तसेच संबंधित सक्षम यंत्रणेकडे प्रकरण पाठवून आवश्यक कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. शहरातील प्रदूषण कमी करण्यासाठी नागरिक, विकासक, बांधकाम व्यावसायिक, कंत्राटदार आणि व्यापाऱ्यांनी महापालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

वायू प्रदूषण नियंत्रणासाठी संबंधित प्रभाग अधिकारी आणि नियुक्त पथकांमार्फत नियमित तपासणी केली जाणार आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती व आस्थापनांची नोंद ठेवून पुनर्तपासणी केली जाईल. गंभीर आणि वारंवार नियमभंग करणाऱ्यांवर संबंधित सक्षम प्राधिकरणांच्या समन्वयाने पुढील कारवाई केली जाणार आहे. स्वच्छ हवा, निरोगी भिवंडी हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी महापालिका प्रशासनाने ही मोहीम हाती घेतली असून, नागरिकांनीही पर्यावरण रक्षणाची जबाबदारी स्वीकारून सहकार्य करावे, असे आवाहन महानगरपालिकेचे उपआयुक्त (पर्यावरण) बाळकृष्ण क्षिरसागर यांनी केले आहे.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

पुणे सेंट्रलसह शहरात 'सिटी फॉरेस्ट्स' द्वारे हरित क्षेत्राचा विस्तार

एचडीएफसी लाईफच्या 'स्वाभिमान' उपक्रमातून पुण्यात सामाजिक व पर्यावरणीय विकासाला चालना

■ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्याच्या शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांना पूरक उपक्रम

■ पुणे (दै. संध्या)



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात पर्यावरण संवर्धन, शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक विकासाला प्राधान्य दिले जात असताना, एचडीएफसी लाईफच्या 'स्वाभिमान' या कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व (CSR) उपक्रमातून पुण्यासह राज्यात विविध विकासात्मक उपक्रम राबविण्यात येत आहेत. कंपनीने गेल्या पाच वर्षांत महाराष्ट्रात २०.७३ कोटी रुपयांची गुंतवणूक केली असून, ४८ प्रकल्पांच्या माध्यमातून ३ लाख ४१ हजार १८० हून अधिक नागरिकांपर्यंत लाभ पोहोचविला आहे. पुण्यातील शहरी हरित क्षेत्राचा विस्तार, शिक्षण आणि समुदाय विकासावर या उपक्रमांतर्गत विशेष भर देण्यात आला आहे. पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने एचडीएफसी लाईफच्या 'सिटी फॉरेस्ट्स' उपक्रमातून पुण्यासह मुंबई, वसई-विरार, नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि जालना येथे २५ शहरी वने आणि दोन घनदाट वने विकसित करण्यात आली आहेत. या माध्यमातून १०.४० लाख चौरस फुटांहून अधिक क्षेत्रावर ९८ हजार ३८० स्थानिक प्रजातींच्या रोपांची लागवड करण्यात आली आहे. शहरी भागातील हरित क्षेत्र वाढविणे, जैवविविधतेचे संवर्धन करणे आणि नागरिकांना पर्यावरणपूरक परिसर उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. पुणे सेंट्रलसह शहरातील हरित विकासाच्या प्रयत्नांना अशा उपक्रमांमुळे बळ मिळत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याच्या विकासात पर्यावरणीय शाश्वतता, आधुनिक पायाभूत सुविधा, शिक्षण आणि आरोग्य या क्षेत्रांना महत्त्व दिले आहे. शासनाच्या विकासाभिमुख धोरणांना पूरक ठरणाऱ्या खासगी क्षेत्रातील सामाजिक उत्तरदायित्वाच्या उपक्रमांमधूनही स्थानिक पातळीवर सकारात्मक बदल घडविण्याची संधी निर्माण होत आहे. एचडीएफसी लाईफच्या 'स्वाभिमान' उपक्रमातून पर्यावरण संवर्धनासोबतच शिक्षण, कौशल्यविकास, आरोग्य आणि उपजीविकेच्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जात आहे.

शिक्षण आणि उपजीविका क्षेत्रात महाराष्ट्रात गेल्या पाच वर्षांत २० कार्यक्रम राबविण्यात आले असून, त्यासाठी ७.८१ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. या उपक्रमांचा ४३ हजार ९४० हून अधिक नागरिकांना लाभ झाला आहे. पुणे, बारामती आणि इंदापूरसह मुंबई, लातूर, पालघर आणि नाशिक येथे अंगणवाडी व्यवस्था सुधारणे, शालेय पायाभूत सुविधा बळकट करणे, डिजिटल शिक्षण, विशेष गरजा असलेल्या मुलांना सहाय्य आणि आर्थिक साक्षरता वाढविण्याचे उपक्रम राबविण्यात आले आहेत. शेतकऱ्यांसाठी उपजीविकेच्या संधी निर्माण करण्यावरही भर देण्यात आला आहे.

पर्यावरणीय उपक्रमांसाठी ६.४३ कोटी

पर्यावरण संवर्धनासाठी महाराष्ट्रात गेल्या पाच वर्षांत ६.४३ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. या अंतर्गत ११ कार्यक्रमांच्या माध्यमातून ३२ हजार ८०० हून अधिक नागरिकांपर्यंत लाभ पोहोचला आहे. मुंबई, ठाणे, नांदेड आणि चिपळूण येथील १० शाळांमध्ये २३०.४४ किलोवॅट क्षमतेचे सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यात आले असून, त्याचा १,४०० हून अधिक विद्यार्थ्यांना लाभ झाला आहे. नागपूरजवळील साकोली येथील सेंदूरवाफा तलावाच्या पुनरुज्जीवनासाठीही सहाय्य करण्यात आले आहे.

अध्यक्षपदी आमदार बापूसाहेब पठारे यांची सर्वानुमते नियुक्ती

■ पुणे (दै. संध्या)



चंदननगर, पुणे येथील प्रतिष्ठित साईबाबा मंदिराचे व्यवस्थापन पाहणाऱ्या श्री साईबाबा चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्षपदी वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार बापूसाहेब पठारे यांची सर्वानुमते नियुक्ती करण्यात आली आहे. यावेळी ट्रस्टच्या अन्य पदाधिकाऱ्यांच्याही नियुक्त्या करण्यात आल्या. त्यामध्ये अध्यक्ष देवेंद्र खवले, वाईस चेयरमैन महेंद्र पठारे, उपाध्यक्ष सुदामराव मते, कार्याध्यक्ष व महाव्यवस्थापकपदी निर्मलकुमार अंचलिया, कोषाध्यक्षपदी पंकज शिंदे, तर कायदेशीर सल्लागारपदी ॲडव्होकेट दिलीप जेधे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. श्री साईबाबा चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून मंदिर व्यवस्थापनाबरोबरच विविध सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, वैद्यकीय आणि शैक्षणिक उपक्रम राबविले जातात. ट्रस्टच्या वतीने अनेक निःशुल्क सेवा प्रकल्प, रक्तदान शिबिरे, कर्करोग तपासणी शिबिरे तसेच विविध समाजोपयोगी उपक्रम सातत्याने आयोजित केले जातात. नवनियुक्त चेअरमन,आमदार बापूसाहेब पठारे यांनी भविष्यात मंदिराचा विस्तार करण्याचा तसेच ट्रस्टच्या माध्यमातून संचालित मातोश्री अनुसया भवन हे समाजातील गरीब, गरजू आणि मध्यमवर्गीय कुटुंबांना उपलब्ध करून देण्याचा संकल्प व्यक्त केला आहे. नवीन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीनिमित्त विविध सामाजिक संस्था, संघटना तसेच समाजातील मान्यवर व्यक्तींनी त्यांचे स्वागत करून अभिनंदन केले आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



मोटोटेक २०२६ पुणेचे उद्घाटन संपन्न

पुणे : दैनिक संध्या

वाहननिर्मिती क्षेत्रासाठी ओईएम अपडेट तर्फे आयोजित विशेष परिषद आणि प्रदर्शन मोटोटेक २०२६ पुणेच्या सातव्या आवृत्तीचे आज उद्घाटन झाले. पीसीएमसी चे आयुक्त व प्रशासक आणि ऑटो क्लस्टर डेव्हलपमेंट अँड रिसर्च इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष डॉ. विजय सूर्यवंशी, आयएएस, यांच्या हस्ते महाराष्ट्र ईव्ही सेलचे राज्य प्रमुख जितेंद्र पाटील आणि इतर मान्यवर उद्योग प्रतिनिधींच्या उपस्थितीत कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. ३०-३१ ऑक्टोबर २०२६ रोजी ऑटो क्लस्टर एक्झिबिशन सेंटर, चिंचवड, पुणे येथे आयोजित हा दोन दिवसीय कार्यक्रम वाहन उत्पादक, तंत्रज्ञान पुरवठादार, वाहन सुटे भाग पुरवठादार, एमएसएमई आणि उद्योग क्षेत्रातील व्यावसायिकांना एकत्र आणत आहे. यंदाची संकल्पना आहे—"पुढील पिढीच्या मोबिलिटीसाठी भविष्यकालीन कारखाना." दीपप्रज्वलनानंतर डॉ. सूर्यवंशी यांनी कार्यक्रम सुरू झाल्याची घोषणा केली. पुणे आणि पिंपरी-चिंचवड हे देशातील आघाडीच्या वाहननिर्मिती केंद्रांपैकी एक असल्याचे सांगत, तंत्रज्ञानाची देवाणघेवाण आणि औद्योगिक विकासासाठी विविध घटकांना एकत्र आणण्यात मोटोटेक बजावत असलेल्या भूमिकेचे त्यांनी कौतुक केले. डॉ. सूर्यवंशी यांनी उत्पादक, स्टार्टअप आणि एमएसएमई यांना ऑटो क्लस्टरमधील उत्पादन आरेखन आणि प्रोटोटाइप निर्मिती सुविधांचा अधिकाधिक वापर करण्याचे आवाहन केले. विशेषतः स्वतःच्या आस्थापनांमध्ये अशा सुविधा नसलेल्या उद्योगांनी त्यांचा लाभ घ्यावा, असे त्यांनी सांगितले. अतिरिक्त यंत्रसामग्री आणि पायाभूत सुविधांच्या गरजा उद्योग प्रतिनिधींनी मांडाव्यात, असे आवाहनही त्यांनी केले. यामध्ये इलेक्ट्रिक वाहननिर्मितीशी संबंधित सुविधांचाही समावेश असून, उद्योगांच्या प्रत्यक्ष गरजांनुसार भविष्यात ऑटो क्लस्टरच्या सुविधांचे आधुनिकीकरण करता येईल, असे त्यांनी नमूद केले. प्रदर्शनातील एका इलेक्ट्रिक ट्रकचा उल्लेख करताना त्यांनी व्यावसायिक वाहतुकीत परिवर्तन घडवून आणण्याची क्षमता विद्युतीकरणात असल्याचे सांगितले. युवकांना इलेक्ट्रिक वाहनांच्या दुरुस्तीचे प्रशिक्षण देण्यासाठी एसकेएफ, टाटा स्ट्राइव आणि पीसीएमसी यांच्या संयुक्त उपक्रमाचीही त्यांनी माहिती दिली. कौशल्य विकास केवळ दुचाकी आणि प्रवासी वाहनांपुरता मर्यादित न ठेवता इलेक्ट्रिक बस आणि ट्रकपर्यंत विस्तारण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पायाभूत सुविधांच्या गरजा आणि स्थानिक अडचणी सोडवण्यासाठी उद्योगांसोबत काम करण्याच्या पीसीएमसीच्या कटिबद्धतेचा डॉ. सूर्यवंशी यांनी पुनरुच्चार केला. महानगरपालिकेच्या सीएसआर पोर्टलच्या माध्यमातून सहकार्याच्या संधी शोधण्याचे आवाहनही त्यांनी कंपन्यांना केले. औद्योगिक विकासात व्यापक सहभागाचे आवाहन करताना त्यांनी तांत्रिक प्रशिक्षण आणि उद्योजकतेमध्ये महिलांचा सहभाग वाढविण्यावर तसेच दिव्यांग व्यक्तींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यावर भर दिला. दिव्यांग भवनमधील प्रशिक्षण आणि सहाय्यक तंत्रज्ञान सुविधांच्या विकासात उद्योगांच्या भागीदारीची भूमिकाही त्यांनी अधोरेखित केली.

जेएसपीएम विद्यापीठ, पुणे यांच्या द्वितीय दीक्षान्त समारंभाचे ३१ रोजी आयोजन

पुणे : दैनिक संध्या

जेएसपीएम विद्यापीठ, पुणे यांच्या द्वितीय दीक्षान्त समारंभाचे आयोजन शनिवार, दिनांक ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता श्रेयश बँक्वेट्स, वाघोली, पुणे येथे करण्यात आले आहे. या समारंभात विद्यापीठाच्या विविध विद्याशाखांतील एकूण १,१७३ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करून त्यांच्या शैक्षणिक यशाचा गौरव करण्यात येणार आहे. या समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून माननीय व्हाइस ॲडमिरल अनिल जग्गी, एव्हीएसएम (AVSM), कमांडंट, राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी, खडकवासला, पुणे, महाराष्ट्र उपस्थित राहणार आहेत. त्यांचे नेतृत्व, शिस्त, समर्पण आणि राष्ट्रसेवेची प्रेरणा पदवीधर विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक ठरेल. या दीक्षान्त समारंभाच्या पार्श्वभूमीवर बुधवार, दिनांक २८ ऑक्टोबर २०२६ रोजी विद्यापीठाच्या वतीने पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली आहे. या पत्रकार परिषदेत विद्यापीठाची शैक्षणिक वाटचाल, दीक्षान्त समारंभाची रूपरेषा, विद्यार्थ्यांचे यश आणि भविष्यातील शैक्षणिक उद्दिष्टांविषयी माहिती देण्यात येणार आहे. विद्यापीठाचे अध्यक्ष डॉ. रवी जोशी आपल्या मनोगतात जेएसपीएम संस्थेची शैक्षणिक परंपरा, गुणवत्तापूर्ण व विद्यार्थिकेंद्रित शिक्षणाची बांधिलकी आणि विद्यार्थ्यांना कौशल्यसंपन्न, आत्मविश्वासपूर्ण व जबाबदार नागरिक म्हणून घडविण्याच्या विद्यापीठाच्या ध्येयावर प्रकाश टाकणार आहेत. विविध विद्याशाखांतील एकूण १,१७३ विद्यार्थ्यांचे पदवीप्राप्तीचे यश हे विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि विद्यापीठातील सर्व घटकांच्या सामूहिक प्रयत्नांचे फलित असल्याचे ते नमूद करतील. संशोधन, नवोपक्रम, उद्योजकता, उद्योगक्षेत्राशी सहकार्य आणि सामाजिक जबाबदारी यांच्या माध्यमातून विद्यापीठाची शैक्षणिक गुणवत्ता अधिक उंचावण्याचा संकल्पही ते व्यक्त करतील.

मुख्यमंत्री यांची आर्यन पंप्सच्या ग्लोबल डिझाइन आणि इनोव्हेशन सेंटरला भेट

■ पुणे (दै. संध्या)



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सेनापती बापट रस्त्यावरील आर्यन हाऊस येथे कार्यरत असलेल्या आर्यन पंप्स अँड एन्व्हायरो सोल्युशन्स प्रा. लि. यांच्या ग्लोबल डिझाइन आणि इनोव्हेशन सेंटरला भेट देऊन तेथील संशोधन व तंत्रज्ञानविषयक कामकाजाची माहिती घेतली. मुख्यमंत्र्यांनी 'मेड इन महाराष्ट्र, मेड फॉर द वर्ल्ड' अभिप्रायासह उद्योजक आणि अभियंत्यांच्या कौशल्याचे कौतुक केले. या केंद्रामार्फत कंपनीच्या जागतिक गरजा पूर्ण करण्यासाठी तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकी क्षेत्रात संशोधन व विकासाचे काम केले जाते. या केंद्रात विकसित करण्यात आलेले अत्याधुनिक हायड्रॉलिक पंप, विशेष उपयोगासाठीचे इंजिनचलित पंप संच, जेटिंग रिसायकलर्स तसेच आपत्कालीन सेवांसाठी आवश्यक असलेल्या 'फर्स्ट रिस्पॉन्स वाहनां'च्या डिझाइन व संशोधन प्रक्रियेची माहिती मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी घेतली. तत्पूर्वी कंपनीने तयार केलेल्या अत्याधुनिक भव्य पंप यंत्रणा बसविण्यात आलेल्या वाहनाचीही त्यांनी पाहणी केली. या वाहनावर 'मेड इन महाराष्ट्र, मेड फॉर द वर्ल्ड' असा अभिप्राय नोंदवत मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी महाराष्ट्रातील उद्योजक आणि अभियंत्यांच्या कौशल्याचे विशेष कौतुक केले. महाराष्ट्रात विकसित होणारे तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकी कौशल्य जागतिक स्तरावर पोहोचत असल्याचे या उपक्रमातून अधोरेखित झाले.

महापालिकेच्या १८ हजार कर्मचाऱ्यांच्या बोनसचा निर्णय जाहीर

पक्षनेता बैठकीत शिक्कामोर्तब :महापौर मंजूषा नागपुरे यांनी दिली माहिती

■ पुणे (दै. संध्या)



पुणे महापालिकेतील सुमारे १८ हजार अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान (बोनस) देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. विशेष म्हणजे, या बोनसच्या रकमेत दरवर्षी दोन हजार रुपयांची वाढ होणार असून, पाच वर्षांसाठी हा करार करण्यात येणार आहे. यंदा २७ हजार रुपये अतिरिक्त रक्कम मिळणार असून, २०२९-३० पर्यंत ती ३५ हजार रुपयांवर पोहोचेल. त्याचबरोबर नवीन भरती झालेल्या कर्मचाऱ्यांसाठी एक वर्ष सेवा पूर्ण करण्याची अट शिथिल करून १८० दिवस प्रत्यक्ष काम केल्यास बोनस देण्याचा निर्णय प्रस्तावित आहे. महापौर मंजूषा नागपुरे यांनी ही माहिती दिली. महापालिकेतील अधिकारी, कर्मचारी, रोजंदारी कामगार, माध्यमिक व तांत्रिक शिक्षण विभागातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, शिक्षण मंडळातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी तसेच बालवाडी शिक्षिका आणि सेविकांना या निर्णयाचा लाभ मिळणार आहे. २०२५-२६ ते २०२९-३० या पाच आर्थिक वर्षांसाठी सानुग्रह अनुदान देण्याची तरतूद करण्यात आली आहे. सुधारित वेतन संरचनेतील मूळ वेतन आणि महागाई भत्ता यांच्या एकत्रित रकमेच्या ८.३३ टक्के अनुदानासोबत अतिरिक्त रक्कम दिली जाणार आहे. नवीन कर्मचाऱ्यांना बोनस मिळण्याबाबत महत्त्वाची शिथिलता देण्यात आली आहे. यापूर्वी एक वर्ष सेवा पूर्ण केल्यानंतर संबंधित आर्थिक वर्षात किमान १८० दिवस प्रत्यक्ष काम केले असल्यास त्यांना बोनस मिळू शकणार आहे. त्यामुळे ३१ मार्चपर्यंत नोकरीत रुजू होऊन आवश्यक पात्रता पूर्ण करणाऱ्या कर्मचाऱ्यांनाही लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. अशा कर्मचाऱ्यांना प्रत्यक्ष हजेरीच्या प्रमाणात बोनस दिला जाईल. प्रसूती रजा, वैद्यकीय रजा यांसह अन्य रजा १८० दिवसांच्या प्रत्यक्ष हजेरीत ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. मात्र, काम करताना झालेल्या अपघातामुळे घ्यावी लागलेली विशेष वैद्यकीय रजा हजेरीमध्ये मोजली जाईल. प्राथमिक शिक्षण विभागातील शिक्षण सेवकांना वेतनाच्या ८.३३ टक्क्यांसह दहा हजार रुपये अतिरिक्त अनुदान दिले जाणार आहे.

आर्थिक वर्ष	अतिरिक्त रक्कम
२०२५-२६	२७ हजार रुपये
२०२६-२७	२९ हजार रुपये
२०२७-२८	३१ हजार रुपये
२०२८-२९	३३ हजार रुपये
२०२९-३०	३५ हजार रुपये

येरवडा म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकासाला गती

■ पुणे (दै. संध्या)

■ सुधारित आराखड्याची प्रक्रिया प्रगतिपथावर

■ ७५ एकर परिसरातील ९० हून अधिक जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रश्न मार्गी लागण्याची अपेक्षा

■ संरक्षण विभागाच्या परवानग्यांचे आव्हान

येरवडा येथील महाराष्ट्र हाउसिंग बोर्डाच्या म्हाडा वसाहतीतील सुमारे ४० वर्षे जुन्या इमारतींच्या पुनर्विकासासाठी प्रशासकीय हालचालींना वेग आला आहे. सुमारे ७५ एकर परिसरात पसरलेल्या या वसाहतीतील ९० हून अधिक इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रश्न मार्गी लागण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. सुधारित विकास आराखड्याला मंजुरी मिळविण्याची प्रक्रिया सुरू असून, समूह पुनर्विकासासाठी व्यवहार्यता अहवाल सादर करण्याची तयारी पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाकडून सुरू आहे. मात्र, संरक्षण विभागाचे निर्बंध आणि आवश्यक ना-हरकत प्रमाणपत्रे मिळविण्याचे आव्हान अद्याप कायम आहे. अशी माहिती रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाचे प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव यांनी दिली. येरवडा येथील सर्व्हे क्रमांक १९१-अ-१ आणि १९१-अ-२ मधील म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकासासंदर्भात पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने शासनाकडे पाठपुरावा सुरू केला आहे. यासंदर्भात मंडळाच्या पत्रातून पुनर्विकासासाठी आवश्यक परवानग्या आणि सुधारित विकास आराखड्याच्या प्रक्रियेची माहिती समोर आली आहे. इमारती जुन्या झाल्यामुळे रहिवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला असून, पुनर्विकास लवकरात लवकर व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. पुणे महानगरपालिकेने ३० ऑक्टोबर १९९९ रोजी मंजूर केलेल्या विकास आराखड्यानुसार संबंधित वसाहतीच्या अभिन्यासाला मंजुरी देण्यात आली होती. एकत्रीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR-2020) मधील तरतुदींनुसार, संबंधित भूखंडावर ३.०० चटई क्षेत्र निर्देशांक (एफएसआय) अनुज्ञेय असल्याचे मंडळाच्या पत्रात नमूद करण्यात आले आहे. मात्र, जुन्या अभिन्यासातील तरतुदी अद्ययावत विकास नियंत्रण नियमावली आणि २०१७ मध्ये मंजूर झालेल्या विकास आराखड्यानुसार सुधारित झालेल्या नसल्याने पुनर्विकासाच्या प्रक्रियेत अडचणी निर्माण झाल्या आहेत. या अडचणी दूर करण्यासाठी सुधारित अभिन्यास तयार करण्यात येत आहे. त्याला संबंधित प्राधिकरणे आणि पुणे महानगरपालिकेची मंजुरी मिळविण्यासाठी मंडळाच्या पॅनेलवरील वास्तुविशारदांची नियुक्ती करण्यात आली आहे.

दिवाळीनिमित्त उमेद स्वयंसहाय्यता समुहांच्या उत्पादनांचे प्रदर्शनाचे आयोजन

■ पुणे (दै. संध्या)

उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत पुणे व छत्रपती संभाजीनगर विभागातील स्वयंसहाय्यता समुहांनी उत्पादित केलेल्या विविध वैशिष्ट्यपूर्ण उत्पादनांचे दिवाळी सणानिमित्त विशेष प्रदर्शन व विक्रीचे आयोजन 31 ऑक्टोबर ते 2 नोव्हेंबर या कालावधीत एसजीएस मॉल, कॅम्प परिसर, पुणे येथे आणि 2 ते 3 नोव्हेंबर या कालावधीत नवीन जिल्हा परिषद, पुणे येथे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती विभागीय आयुक्त कार्यालयाच्या अप्पर आयुक्त प्रांजल शिंदे यांनी दिली आहे. स्वयंसहाय्यता समुहांतील महिलांनी आपल्या कौशल्यातून व मेहनतीतून तयार केलेल्या विविध दर्जेदार व वैशिष्ट्यपूर्ण उत्पादनांना ग्राहकांचा प्रतिसाद मिळावा, महिलांच्या उत्पन्नात वाढ व्हावी तसेच त्यांना स्वयंरोजगार व उद्योजकतेच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी प्रोत्साहन मिळावे हा या प्रदर्शनाच्या आयोजनामागील प्रमुख उद्देश आहे. प्रदर्शनामध्ये पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, लातूर, जालना, बीड, परभणी, हिंगोली, धाराशिव व नांदेड अशा 13 जिल्ह्यातील समुहांनी तयार केलेल्या उत्पादनांची खरेदी करण्याची संधी मिळणार आहे. विविध उत्पादनांची मोठ्या प्रमाणावर खरेदी करावी व ग्रामीण अर्थव्यवस्थेला हातभार लावावा, असे आवाहन श्रीमती शिंदे यांनी केले आहे.

नोव्हेंबर अखेर बृहद् आराखडा केंद्र शासनाकडे सादर करणार

पुणे ग्रोथ हबच्या विकास आराखड्याचा उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्याकडून आढावा

पहिल्या टप्प्यात पाच हजार कोटींच्या निधीची मागणी

■ पुणे (दै. संध्या)



पुणे महानगर प्रदेशाचा सर्वांगीण विकास करून पुण्याला जागतिक दर्जाचे आर्थिक केंद्र बनविण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या 'पुणे ग्रोथ हब' उपक्रमाच्या विकास आराखड्याचा उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा घेतला. या बैठकीत माजी मुख्य सचिव तथा सहाव्या राज्य वित्त आयोगाचे अध्यक्ष डॉ.नितीन करीर,विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर,पुणे महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम,पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त विजय सूर्यवंशी,पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त अभिजित चौधरी,जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील उपस्थित होते. नीती आयोगाच्या पुढाकाराने देशातील मुंबई, सुरत,वाराणसी आणि विशाखापट्टणम् या शहरांमध्ये ग्रोथ हब उपक्रम राबविण्यात येत असून,त्यामध्ये पुण्याचाही समावेश करण्यात आला आहे.यासाठी मागील वर्षी ऑगस्ट महिन्यात महाराष्ट्र शासन, नीती आयोग आणि पुणे इंटरनॅशनल सेंटर यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे.या उपक्रमाच्या नियोजनासाठी स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीची बैठक आज पार पडली. पुणे महानगर प्रदेशातील औद्योगिक,माहिती तंत्रज्ञान,वाहन उद्योग, शिक्षण,विमान वाहतूक, आरोग्य, कृषी आणि संशोधन अशा विविध क्षेत्रांतील विकासाच्या संधी विचारात घेऊन हा आराखडा तयार करण्यात येत आहे. सर्व संबंधित विभागांच्या सूचना आणि प्रस्तावांचा विचार करून विकासाची दिशा निश्चित केली जात आहे. येत्या नोव्हेंबरअखेर पुणे ग्रोथ हबचा बृहद् विकास आराखडा मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील शिखर समितीमार्फत केंद्र शासनाकडे सादर करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात या प्रकल्पासाठी केंद्र शासनाकडून पाच हजार कोटी रुपयांचा निधी मिळावा, अशी मागणी करण्यात येणार आहे. सन २०३६ पर्यंतच्या पुढील दहा वर्षांच्या कालावधीत या उपक्रमाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर आर्थिक गुंतवणूक अपेक्षित आहे. या गुंतवणुकीतून पुणे महानगर प्रदेशातील पायाभूत सुविधा, उद्योग आणि विविध क्षेत्रांचा विकास साधून पुण्याला जागतिक दर्जाचे आर्थिक केंद्र बनविण्याच्या दृष्टीने शासन प्रयत्नशील आहे, असे यावेळी नमूद करण्यात आले.

बिस्मिल की मेहफील १ नोव्हेंबर रोजी पुण्यात सादर करणार

सुफी-फ्युजन संगीताचा अनोखा अनुभव

■ पुणे (दै. संध्या)

बिस्मिल की मेहफीलच्या सादरीकरणासह १ नोव्हेंबर २०२६ रोजी मेफिल्ड इस्टेट येथे संगीतमय सायंकाळी पुण्यातील लाईव्ह मनोरंजनाची रंगत वाढणार आहे. झी लाईव्हचा प्रमुख लाईव्ह मनोरंजन मंच सुपरमूनकडून सादर होणारा हा शो सुफी शायरीची भावनिक खोली, मधुरमय धून आणि समकालीन लाईव्ह कॉन्सर्टच्या ऊर्जेचा सुरेख संगम घडवून आणेल. पारंपरिक सुफी प्रभाव आणि आधुनिक संगीत मांडणी यांची सांगड घालत बिस्मिल की मेहफील प्रेक्षकांना भावपूर्ण गायकी आणि प्रचंड ऊर्जा देणाऱ्या सादरीकरणाचा अनोखा अनुभव देते. बिस्मिल यांचा वैशिष्ट्यपूर्ण आवाज आणि मंचावरील प्रभावी उपस्थितीसह हा शो सुफी संगीतातील काव्य आणि भावनांना लाईव्ह कॉन्सर्टच्या स्वरूपात समोर आणतो, ज्यामुळे प्रेक्षकांनाही ओळखीच्या सुरांमध्ये सहभागी होण्याची आणि संगीताशी एकरूप होण्याची संधी मिळते.

पुण्यातील शोबाबत मत व्यक्त करत झी लाईव्हचे बिझनेस हेड गॅरेथ एस्विन थॉमस म्हणाले,"पुण्याला समृद्ध सांस्कृतिक आणि मनोरंजन वारसा लाभला आहे येथील प्रेक्षक संगीत आणि लाईव्ह अनुभवांचे मनापासून कौतुक करतात. बिस्मिल की मेहफीलच्या माध्यमातून आम्ही शहरासाठी उत्साहवर्धक सायंकाळ घेऊन येत आहोत, जी सुफी संगीताची समृद्धी साजरी करण्यासोबत लाईव्ह परफॉर्मन्सची ऊर्जा आणि संवादही साधेल. संगीताच्या माध्यमातून व्यक्तींना एकत्र आणणारे अनुभव निर्माण करणे हेच सुपरमूनचे उद्दिष्ट आहे." बिस्मिल यांच्यासाठी कलाकार, कविता आणि प्रेक्षक यांच्यातील नाते या अनुभवाच्या केंद्रस्थानी आहे. बिस्मिल म्हणाले, "मी पुण्यात 'बिस्मिल की मेहफील' सादर करण्यासाठी अत्यंत उत्सुक आहे. माझ्या मते, मेहफील म्हणजे संगीत आणि कवितेतून निर्माण होणारे नाते आणि प्रत्येक सादरीकरणात प्रेक्षक घेऊन येत असलेली ऊर्जा होय. आम्ही सर्वजण एकत्र गात, सुमधुर स्वरांचा आनंद घेत आणि शो संपल्यानंतरही दीर्घकाळ स्मरणात राहणारे क्षण निर्माण करत एका सुरेल सायंकाळसाठी सज्ज आहोत." पुण्यातील हे सादरीकरण जाहीर झालेल्या भारत दौऱ्याचा पहिला टप्पा आहे. यानंतर हा दौरा १४ नोव्हेंबरला जयपूर आणि २८ नोव्हेंबरला हैदराबाद येथे जाईल, त्यानंतर २४ डिसेंबरला इंदोर आणि १६ जानेवारी २०२७ रोजी अहमदाबाद येथे पोहोचेल. मुंबई आणि दिल्लीमध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या इव्हेण्टच्या तारखा लवकरच जाहीर केल्या जातील.



इव्हेण्टचा तपशील

इव्हेण्ट: बिस्मिल की मेहफील
तारीख: १ नोव्हेंबर २०२६
स्थळ: मेफिल्ड इस्टेट, पुणे
तिकिटे: https://in.bookmyshow.com/events/bismil-ki-mehfil/ET00515605

वनप्लसने निवडक स्मार्टफोन्स, टॅब्लेट्स आणि ऑडिओ उत्पादनांवर आतापर्यंतच्या सर्वात कमी किमतींसह फेस्टिव्ह सेलचा कालावधी वाढवला



■ नवी दिल्ली (दै. संध्या)

वनप्लस आपल्या स्मार्टफोन, टॅब्लेट आणि ऑडिओ पोर्टफोलिओमध्ये अतिरिक्त ऑफर्ससह फेस्टिव्ह सेलचा कालावधी वाढवून या सणासुदीच्या हंगामात ग्राहकांना अपग्रेड करण्यासाठी आणखी कारणे देत आहे. विस्तारित फेस्टिव्ह कॅम्पेनचा भाग म्हणून, निवडक डिव्हाइसेस आता त्यांच्या आतापर्यंतच्या सर्वात कमी किमतींमध्ये उपलब्ध आहेत. यामध्ये वनप्लस 15 आर ₹59,999 आणि वनप्लस एनɛएक्स ₹17,499 या किमतीत उपलब्ध आहे. फेस्टिव्ह ऑफर्स सध्या सुरू आहेत आणि त्यांचा लाभ ऑनलाइन वनप्लस.इन, ॲमेझॉन ग्रेट इंडियन फेस्टिव्हल दरम्यान ॲमेझॉन.इन आणि वनप्लस स्टोअर ॲपद्वारे घेता येईल. तसेच ऑफलाइन माध्यमातून वनप्लस एक्सपीरियन्स स्टोअर्स आणि निवडक पार्टनर आउटलेट्समध्येही या ऑफर्स उपलब्ध आहेत. याशिवाय, ग्राहकांना फ्लिपकार्ट बिग बिलियन डेज सेल दरम्यान फ्लिपकार्ट, मिंत्रा, ब्लिंकिट तसेच रिलायन्स क्रोमा आणि विजय सेल्स सारख्या निवडक ऑफलाइन भागीदारांमार्फत आयओटी उत्पादनांचा लाभ घेता येईल. नॉर्ड लाइनअपमध्ये, वनप्लस नॉर्ड 6, नॉर्ड सीई 6 आणि नॉर्ड सीई 6 लाइट अनुक्रमे ₹42,999, ₹32,999 आणि ₹25,999 या नेट इफेक्टिव्ह किमतींमध्ये उपलब्ध आहेत. ग्राहक निवडक मॉडेल्सवर नो-कॉस्ट ईएमआयचाही लाभ घेऊ शकतात. एन सिरीजमध्येही आकर्षक फेस्टिव्ह किंमती उपलब्ध आहेत. वनप्लस एनɛ ₹20,999 मध्ये, वनप्लस एनɛएक्स त्याच्या आतापर्यंतच्या सर्वात कमी इफेक्टिव्ह किंमतीत ₹17,499 मध्ये आणि वनप्लस एनɛ लाइट ₹14,249 मध्ये उपलब्ध आहे. यासोबतच निवडक व्हेरिएंट्सवर फायनान्सिंग पर्यायांचाही लाभ उपलब्ध आहे. वनप्लसने आपल्या टॅब्लेट पोर्टफोलिओवरील फेस्टिव्ह ऑफर्सचाही कालावधी वाढवला आहे. वनप्लस पॅड 4 ₹58,999 या नेट इफेक्टिव्ह किमतीत उपलब्ध असून त्यासोबत मोफत वनप्लस स्टायलो प्रो दिला जात आहे. वनप्लस पॅड गो 2 आणि पॅड गो 2 5 जी खरेदी करणाऱ्या ग्राहकांना मोफत वनप्लस गो2 स्टायलो देखील मिळू शकतो. तसेच, वनप्लस पॅड लाइट ₹20,749 या इफेक्टिव्ह किमतीत उपलब्ध आहे, ज्यामुळे हा लाइनअप प्रॉडक्टिव्हिटी, शिक्षण आणि मनोरंजनासाठी एक आकर्षक पर्याय ठरतो. फेस्टिव्ह सेलमध्ये वनप्लसच्या ऑडिओ पोर्टफोलिओवरील विशेष ऑफर्सचाही समावेश आहे. ग्राहक वनप्लस बुलेट्स वायरलेस झेड 3 ₹1,549 मध्ये, बुलेट्स वायरलेस झेड 2 एएनसी ₹2,049 मध्ये, नॉर्ड बड्स 3r ₹1,649 मध्ये, नॉर्ड बड्स 4 ₹2,899 मध्ये, नॉर्ड बड्स 4 प्रो ₹3,799 मध्ये, वनप्लस बड्स 4 ₹5,599 मध्ये आणि प्रीमियम वनप्लस बड्स प्रो 3 ₹8,999 मध्ये खरेदी करू शकतात.

उत्पादनांवरील ऑफर्सची वैशिष्ट्ये

वनप्लसने आपल्या फ्लॅगशिप, नॉर्ड आणि एन सिरीज स्मार्टफोन लाइनअपमध्ये फेस्टिव्ह ऑफर्स सादर केल्या आहेत, ज्यामुळे ग्राहकांना सणासुदीच्या हंगामात अपग्रेड करणे अधिक सोपे झाले आहे. वनप्लस 15 ₹81,999 या नेट इफेक्टिव्ह किमतीत उपलब्ध आहे, तर वनप्लस 15 आर त्याच्या आतापर्यंतच्या सर्वात कमी इफेक्टिव्ह किंमतीत ₹59,999 मध्ये उपलब्ध आहे. कॉम्पॅक्ट फ्लॅगशिप वनप्लस 13s ₹61,999 मध्ये खरेदी करता येईल.

थोडक्यात पण महत्वाचे

ज्ञान प्रसाद ग्लोबल विद्यापीठाचा पहिला दीक्षांत समारंभ संपन्न



पुणे : दैनिक संध्या

डॉ. डी. वाय. पाटील युनिटेक सोसायटी संचलित ज्ञान प्रसाद ग्लोबल विद्यापीठाचा (डीपीजीयू) पहिला दीक्षांत समारंभ आज मोठ्या उत्साहात पार पडला. या ऐतिहासिक सोहळ्यात २३६ पदवीधरांना पदव्या प्रदान करण्यात आल्या, तर ३ गुणवंत विद्यार्थ्यांना सुवर्णपदकाने सन्मानित करण्यात आले. या समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग आणि संसदीय कार्य मंत्री मा. ना. श्री. चंद्रकांत (दादा) पाटील उपस्थित होते. त्यांच्यासमवेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे सल्लागार परिषद सदस्य मा. श्री. राजेश पांडे, डॉ. डी. वाय. पाटील युनिटेक सोसायटीचे अध्यक्ष मा. डॉ. पी. डी. पाटील, ज्ञान प्रसाद ग्लोबल विद्यापीठाचे प्र-कुलपती मा. डॉ. सोमनाथ पी. पाटील, डॉ . डी . वाय . पाटील विद्यापीठ पिंपरी च्या प्र-कुलगुरू मा. डॉ. सौ. स्मिता जाधव, ज्ञान प्रसाद ग्लोबल विद्यापीठाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मा. डॉ. रोहिणी एस. पाटील, डॉ . डी . वाय . पाटील विद्यापीठाचे खजिनदार मा. डॉ. यशराज पी. पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी मनोगत व्यक्त करताना मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले,राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आणि शासनाकडून स्वायत्त विद्यापीठांच्या स्थापनेला दिले जाणारे प्रोत्साहन हे अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. यातूनच ज्ञान प्रसाद ग्लोबल विद्यापीठासारखी दर्जेदार आणि व्यवसायाभिमुख शिक्षण देणारी विद्यापीठे उभी राहत आहेत.

'एनएसटी पुणे'चा इंटर्नशिप प्लेसमेंट दर ९८.३ टक्क्यांवर

पुणे : दैनिक संध्या

न्यूटन स्कूल ऑफ टेक्नॉलॉजीने (एनएसटी) २०२८च्या बॅचमधील पात्र विद्यार्थ्यांचा इंटर्नशिप प्लेसमेंट दर ९८.३ टक्के नोंदवला आहे. विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांना मिळालेल्या इंटर्नशिपपैकी जवळपास एक तृतीयांश संधी एआय आणि डेटा क्षेत्रातील कंपन्यांमध्ये मिळाल्या आहेत. एनएसटीच्या इंटर्नशिप रिपोर्ट २०२६मध्ये ही माहिती प्रसिद्ध करण्यात आली आहे. अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठात संगणकशास्त्र आणि कृत्रिम बुद्धिमत्ता विषयांचा अभ्यास करणाऱ्या ३१३ विद्यार्थ्यांच्या बॅचचा हा अहवाल आहे. या विद्यार्थ्यांना १७३ कंपन्यांमध्ये इंटर्नशिपच्या संधी मिळाल्या. यापूर्वी एनएसटीच्या एनसीआर केंद्रातील १०४ विद्यार्थ्यांचा प्लेसमेंट दर ९३.०७ टक्के नोंदवण्यात आला होता. पुणे केंद्रातील मोठ्या बॅचनेही चांगली कामगिरी केली आहे. या अहवालाची स्वतंत्र पडताळणी चार्टर्ड अकाउंटंट्स सोराब एस. इंजिनीअर अँड कंपनी यांनी केली आहे. ऑफर लेटर आणि कंपन्यांशी झालेला पत्रव्यवहार यांसह आवश्यक कागदपत्रांच्या आधारे निष्कर्ष तपासण्यात आले. एआय आणि डेटा क्षेत्रानंतर सॉफ्टवेअर, सास आणि तंत्रज्ञान सेवा क्षेत्रातील कंपन्यांमध्ये ७९ विद्यार्थ्यांची निवड झाली. शिक्षण, वित्तीय तंत्रज्ञान, उत्पादन, हार्डवेअर आणि आरोग्यसेवा क्षेत्रांतही विद्यार्थ्यांना संधी मिळाल्या. विद्यार्थ्यांचा सरासरी मासिक स्टायपेंड २३,१४९ रुपये असून, सर्वाधिक मासिक समतुल्य स्टायपेंड १.९ लाख रुपयांपर्यंत पोहोचले. विद्यार्थ्यांनी एआय मॉडेल मूल्यांकन, उपग्रह नेव्हिगेशन, ड्रोन नियंत्रण आणि ओपन-सोर्स सॉफ्टवेअर यांसारख्या प्रकल्पांवर प्रत्यक्ष काम केले. बिराजित सैकिया यांनी अमेरिकेतील आफ्टरक्वेरी कंपनीत एआय मॉडेल मूल्यांकनासाठी पायाभूत सुविधा उभारण्यास हातभार लावला. रमन पांडे यांनी VyomIC येथे उपग्रह संकेतांमधील हस्तक्षेपाचे विश्लेषण केले, तर देवेंद्र मिश्रा यांनी ड्रोन एव्हिएशन येथे ब्राउझर आधारित ड्रोन नियंत्रण प्रणाली विकसित केली.

कॅसाग्रँडच्या घर खरेदीवर आता iPhone 18 प्रोची भेट

■ सणासुदीत घर खरेदीचा आनंद होणार अधिक खास

■ या सणासुदीच्या काळात घर खरेदीदारांसाठी कॅसाग्रँडची खास iPhone 18 प्रो ऑफर

■ पुणे (दै. संध्या)

भारतातील आघाडीच्या रिअल इस्टेट डेव्हलपर्सपैकी एक असलेल्या कॅसाग्रँडने पुण्यातील अप्पर खराडी परिसरातील आपल्या प्रीमियम निवासी प्रकल्प'कॅसाग्रँड कॅलेडियम'मध्ये घर खरेदी करणाऱ्या ग्राहकांसाठी सणासुदीची खास ऑफर जाहीर केली आहे. या ऑफरअंतर्गत घर खरेदी करणाऱ्या ग्राहकांना कंपनीकडून एक नवीन iPhone18 प्रो भेट म्हणून देण्यात येणार आहे. कॅसाग्रँड कॅलॅडियममध्ये आकर्षक पद्धतीने तयार केलेली घरे असून, येथे आधुनिक सोयीसुविधा उपलब्ध आहेत. तसेच, प्रमुख आयटी पार्क, शाळा आणि मनोरंजनाच्या ठिकाणांशी या प्रकल्पाची उत्तम कनेक्टिव्हिटी आहे.

सणासुदीचा काळ हा कुटुंबांसाठी नवीन सुरुवात करण्यासाठी आणि स्वतःचे घर घेण्यासारखे महत्त्वाचे निर्णय घेण्यासाठी असतो. हीच सणासुदीच्या भेटवस्तू देण्याची भावना लक्षात घेऊन कॅसाग्रँडने घर खरेदीच्या या आनंदाच्या क्षणाला आणखी खास बनवण्यासाठी ग्राहकांना एक प्रीमियम जीवनशैलीची भेटवस्तू देण्याची घोषणा केली आहे. दर्जेदार बांधकाम, विचारपूर्वक डिझाइन केलेल्या घरांची रचना, नामांकित ब्रँडच्या वस्तू आणि आधुनिक जीवनशैलीसाठी आवश्यक सुविधा ही कॅसाग्रँडच्या घरांची वैशिष्ट्ये आहेत. त्यामुळे घर खरेदी करणाऱ्या ग्राहकांना त्यांच्या गुंतवणुकीचा चांगला फायदा मिळण्यासोबतच जीवनशैलीतही सुधारणा करता येते. या सणासुदीच्या ऑफरमुळे घर खरेदीदारांना त्यांच्या स्वप्नातील घर खरेदी करण्यासाठी आणखी एक खास कारण मिळणार आहे.

2.8 एकर परिसरात पसरलेला कॅसाग्रँड कॅलेडियम हा सिंगापूरच्या वास्तुकलेपासून प्रेरित असा प्रीमियम निवासी प्रकल्प आहे. या प्रकल्पात आकर्षक पद्धतीने डिझाइन केलेली 2 आणि 3 बीएचके प्रकारातील एकूण 334 प्रशस्त घरे उपलब्ध आहेत. रहिवाशांना अधिक खासगीपणा आणि आरामदायी वातावरण मिळावे, यासाठी प्रत्येक मजल्यावर फक्त चार घरे ठेवण्यात आली आहेत. आधुनिक शहरी जीवनशैलीचा विचार करून या प्रकल्पात आधुनिक शहरी जीवनशैलीचा विचार करून 110 हून अधिक सोयीसुविधा देण्यात आल्या आहेत. यामध्ये छतावरील 1,800 चौरस फुटांचा इन्फिनिटी स्विमिंग पूल, 13,500 चौरस फुटांचे क्लब हाऊस तसेच आरोग्य, खेळ, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष सोयीसुविधांचा समावेश आहे.

हा प्रकल्प महाराष्ट्र रेरा (MahaRERA) अंतर्गत नोंदणीकृत असून त्याचा नोंदणी क्रमांक P52100080302 आहे. या विशेष ऑफरअंतर्गत उपलब्ध असलेल्या घरांची माहिती घेण्यासाठी ग्राहक कॅसाग्रँडच्या कोणत्याही प्रकल्पाच्या ठिकाणी भेट देऊ शकतात किंवा www.casagrand.co.in या वेबसाइटला भेट देऊ शकतात. ही खास ऑफर 2 नोव्हेंबर 2026 पर्यंत लागू आहे.

जागतिक सोरायसिस दिनानिमित्त सोरियाट्रीटचा पुढाकार

■ त्वचेपलीकडील आजाराच्या भावनिक आणि सामाजिक पैलूंवर वेबिनारमध्ये चर्चा

■ पुणे (दै. संध्या)

जागतिक सोरायसिस दिनानिमित्त सोरियाट्रीट तर्फे गुरुवारी मोफत ऑनलाइन जनजागृती वेबिनारचे आयोजन करण्यात आले. या वेबिनारमध्ये सोरायसिसच्या केवळ त्वचेवर दिसणाऱ्या लक्षणांवरच नव्हे, तर या आजाराचा रुग्णांच्या भावनिक आरोग्यावर आणि सामाजिक जीवनावर होणाऱ्या परिणामांवरही चर्चा करण्यात आली. 'Understanding Psoriasis. Understanding You.' अर्थात 'सोरायसिस समजून घ्या, रुग्णालाही समजून घ्या' हा या उपक्रमाचा मुख्य संदेश होता.या वेबिनारमध्ये सुमारे चार दशकांचा अनुभव असलेले होमिओपॅथिक सोरायसिस तज्ज्ञ डॉ. आर. एस. सोनवणे आणि डॉ. सोनल सहभागी झाले. डॉ. सोनवणे यांच्या ध्वनिचित्रमुद्रित मार्गदर्शनासह डॉ. सोनल यांनी थेट संवाद साधत सहभागींच्या प्रश्नांना उत्तरे दिली. सोरायसिसविषयीचे गैरसमज दूर करणे, योग्य माहितीचा प्रसार करणे आणि या आजाराने ग्रस्त असलेल्या व्यक्तींकडे अधिक संवेदनशीलतेने पाहण्याची गरज अधोरेखित करणे हा या वेबिनारचा उद्देश होता. हा उपक्रम सोरियाट्रीट च्या जागतिक सोरायसिस सप्ताह २०२६ अंतर्गत राबविण्यात आलेल्या 'Look Beyond My Skin' या जनजागृती मोहिमेचा भाग होता. सोरायसिसचा परिणाम केवळ त्वचेपुरता मर्यादित नसून, रुग्णांना अनाहूत नजरा, अस्वस्थ करणारे प्रश्न, दिसण्यावरून होणारे मूल्यमापन आणि सामाजिक भेदभाव यांचाही सामना करावा लागू शकतो, याकडे या मोहिमेतून लक्ष वेधण्यात आले. त्वचेवरील लक्षणांपलीकडे रुग्णाच्या भावना समजून घेणे गरजेचे सोरायसिसच्या रुग्णांवर जवळपास चार दशकांपासून उपचार करणारे डॉ. आर. एस. सोनवणे म्हणाले की, त्वचेवर दिसणारी लक्षणे ही या आजाराची केवळ एक बाजू आहे. रुग्णांच्या मनातील भावना, त्यांचे अनुभव आणि सामाजिक अडचणी समजून घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे.



जाहीर नोटीस

तमाम लोकांस विषेशतः नगरपरिषद शहर जुन्नर, ता. जुन्नर, जि. पु आसपासचे तसेच जुन्नर तालुक्यातील सर्व लोकांना आमचे आशिल श्री. १) सुशिला आत्माराम गाडेकर २) जालिंदर आत्माराम गाडेकर ३) भाग्येश आत्माराम गाडेकर रा. बेळेआळी, जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे यांनी सांगितलेवरून व दिलेल्या माहितीवरून या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

खालील परिशिष्ट वर्णन केलेली मिळकत १) सुशिला आत्माराम गाडेकर २) जालिंदर आत्माराम गाडेकर ३) भाग्येश आत्माराम गाडेकर यांची वडिलोपार्जित सामाईक मालकी हिश्याची व वहिवाटीची आहे. सध्याचे विद्यमान मालकांनी खालील वर्णन केलेले क्षेत्र श्री. विठठल कुशाबा मुदगुन रा. कैलास निवास, रूम नं. ०३. कोळसेवाडी, तीसगाव रोड, पो. काटेमानिवली, कल्याण (ई), ठाणे यांना विक्री करण्याचे ठरविले आहे तसा बयाना देखील दिलेला आहे. तरी या जाहीर नोटीसीने सर्वांना कळविण्यात येते की, वरील जमिनी संदर्भात कोणाचेही मालकी हक्क, हितसंबंध ताबे वहिवाट, बक्षीस पत्र लीन, गहाण दान, लीज, भाडेपटटा, खरेदी विक्री, साठेखत वगैरे मार्गाने या अगोदर व्यवहार झाले असल्यास अथवा त्यासंबंधातील संबंधित जमीनीत इतर कोणाचेही हक्क हितसंबंध तसेच सदर जमीन निर्वेध, निजोखमी असल्याबाबत व कोणत्याही संपादनाचा भाग असल्यास आमचे आशिलांस तशी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून आठ दिवसाचे आत खाली दिलेल्या वकिलांचे पत्यावर योग्य त्या पुराव्यानिशी संपर्क साधावा व आमचे अशिलांची खात्री करून द्यावी. अन्यया सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी अशी असून सदर मिळकतीशी इतर कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व तो असल्यास जावपूर्वक सोडून दिला आहे असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील त्यानंतर कुचीही कसलीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसवणूक होऊ नये. मुद्दाम ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली आहे.

परिशिष्ट

मिळकतीचे वर्णन - नगर परिषद शहर जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे , गणेश पेठ येथील सि.स.नं. २०४२ यांसी क्षेत्र १८३.६० यापैकी ५७.९१ चौरस मीटर , क्षेत्र व त्यावरील घर मालमत्ता क्रमांक. झेडसीबी ३९००२२८४ (जुना क्रमांक. ६अ) सिमेंट चुना यांचा गिलावा दिलेली दगड विटाची भारवाई संरचना, तळमजला, व त्या पुढील बखळ जागा (रुंदी १९.५० फूट लांबी ९ फूट) १६ चौ.मी.

यातील सर्व हक्क जाणे येण्याचे वहिवाटीसह मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

जुन्नर
येणेप्रमाणे जाहीर नोटीस
दि. २९/१०/२०२६

ॲड. रोहिणी लक्ष्मण गाडेकर
(बी.ए.एल. एल. बी.डी. एल. एल.)
रा. ओतूर, ता. जुन्नर, जि. पुणे. ४१०५०२.
मोबाईल नं. ९८६०४८३०३१.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

ई-निविदा सुचना

महावितरण तर्फे कार्यकारी अभियंता (स्था), स्थापत्य विभाग कार्यालय पुणे अंतर्गत महावितरणचे विविध कार्यालय / उपकेंद्र येथील स्थापत्य दुरुस्तीची/ नवीन कामे करणेसाठी महावितरणमधील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून T-०४५/२०२६-२७ ते T-०५६/२०२६-२७ साठी ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा महावितरणच्या संकेतस्थळावर (https://etender.mahadiscom.in/eatApp) **दि. ३१.१०.२०२६ ते ०६.११.२०२६** पर्यंत दुपारी १३:०० वाजे पर्यंत उपलब्ध आहेत. तसेच निविदा **दि. ०६.११.२०२६ रोजी दुपारी १५:००** वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील. सदर निविदा **दि. ०६.११.२०२६ रोजी १५:३०** वाजता शक्य असल्यास उघडण्यात येतील. निविदासंदर्भात अधिक माहितीसाठी अति. कार्यकारी अभियंता (स्था) विभाग, पुणे यांना भ्रमणध्वनी क्र. ७८७५७६७८२४ वर संपर्क साधावा. निमस्वाक्षरीकार यांनी कुठलेही कारण न देता सर्व निविदा स्वीकारणे अथवा रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवलेला आहे. तसेच कंत्राटदारांना विनंती करण्यात येते की, महावितरण च्या निविदा संकेतस्थळावर आपली नोंदणी करून घ्यावी. तसेच निविदेबाबत काही मुदतवाढ किंवा शुद्धी पत्रकाबाबत फक्त संकेतस्थळावरील "Announcements" मध्येच कळविण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

स्वा/-
कार्यकारी अभियंता (स्था),
स्थापत्य विभाग, पुणे.

PRO No. PRO/PZ/160/2026-27

स्ट्रोक ही वैद्यकीय आणीबाणी; मेंदू वाचवण्यासाठी प्रत्येक मिनिट महत्त्वाचे

■ हैदराबाद (दै. संध्या)

मेंदूला होणारा रक्तपुरवठा अचानक थांबणे किंवा मेंदूमध्ये रक्तस्राव होणे यामुळे स्ट्रोक होतो. स्ट्रोकची लक्षणे दिसताच विलंब न करता रुग्णाला रुग्णालयात दाखल करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. उपचारास झालेला विलंब मेंदूचे गंभीर नुकसान करून कायमस्वरूपी अपंगत्वास कारणीभूत ठरू शकतो, असे मेडिकव्हर हॉस्पिटल्स, सिकंदराबाद येथील वरिष्ठ सल्लागार न्यूरो फिजिशियन डॉ. भगवान आंगे यांनी सांगितले.

भारतात दरवर्षी लाखो लोकांना स्ट्रोकचा धोका असतो. चेहरा अचानक वाकणे, हात किंवा पायात अशक्तपणा जाणवणे, बोलताना शब्द अस्पष्ट होणे किंवा दृष्टीमध्ये अचानक बदल होणे ही स्ट्रोकची प्रमुख लक्षणे आहेत. या लक्षणांकडे सामान्य अशक्तपणा म्हणून दुर्लक्ष करू नये. रात्रीच्या वेळी लक्षणे दिसली तरी सकाळपर्यंत थांबू नये.



तातडीने रुग्णालयात पोहोचल्यास वेळेत उपचार मिळण्याची शक्यता वाढते. इस्केमिक स्ट्रोकमध्ये मेंदूला रक्तपुरवठा करणाऱ्या रक्तवाहिनीत रक्ताची गाठ तयार होऊन रक्तप्रवाह बंद होतो. योग्य रुग्णांमध्ये निर्धारित कालावधीत थ्रोम्बोलिटिक उपचार दिल्यास रक्ताची गाठ विरघळवून रक्तप्रवाह पूर्ववत करण्यास मदत होऊ शकते. काही रुग्णांना रक्तवाहिनीतून रक्ताची गाठ काढण्यासाठी विशेष प्रक्रिया करण्याचीही गरज भासू शकते. उपचाराची निवड मेंदूच्या इमेजिंग अहवालावर, लक्षणे सुरू झाल्याच्या वेळेवर आणि रुग्णाच्या एकूण आरोग्यस्थितीवर अवलंबून असते. त्यामुळे तातडीने तपासणी आणि उपचार सुरू करणे महत्त्वाचे आहे.

उच्च रक्तदाब, मधुमेह, वाढलेले कोलेस्ट्रॉल, धूम्रपान, अतिमद्यपान तसेच काही हृदयविकारांमुळे स्ट्रोकचा धोका वाढतो. रक्तदाब, रक्तातील साखर आणि कोलेस्ट्रॉलची नियमित तपासणी करणे आवश्यक आहे. संतुलित आहार, नियमित व्यायाम, आरोग्य तपासण्या आणि डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार औषधांचे सेवन यामुळे स्ट्रोकचा धोका कमी करण्यास मदत होते.

पुणे महानगरपालिका

निविदा जाहिरात - नवीन कामे

विक्री कालावधी दिनांक :-३१/१०/२०२६ ते १२/११/२०२६ दुपारी २:३० पर्यंत
स्विकृती दिनांक :-३१/१०/२०२६ ते १२/११/२०२६ दुपारी २:३० पर्यंत

जाहिरात क्र. २/९२८ दि. ३०/१०/२०२६
तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक:- १३/११/२०२६ दुपारी ३:३० वा.

अ. क्र.	निविदा क्र.	खात्याचे नाव	कामाचे नाव	निविदा संच किंमत रु.	अंदाजित पुर्वगणित रक्कम रू.	बयाणा रक्कम रु.	कामाची मुदत	निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक
१	PMC/ VEHICLE /2026/107	मोटार वाहन विभाग	विविध क्षेत्रीय कार्यालयाकडील स्वच्छ सेवा सहकारी संस्थेकडील ढकलगाडे मटेरियल सह दुरुस्ती करणे.	१,३५९/-	४१,३३,८९८/-	४१,३३८/-	१ वर्ष/टेंडर रक्कम संपेपर्यंत	श्री. संदीप चौगुले ९६८९९३०१२६ श्री. संदीप तावरे ९६८९९३०१२६

अ) पुणे म.न.पा. ची वरील कामे ही अनुभवी / म.न.पा. मान्यता प्राप्त / शासन मान्यता प्राप्त ठेकेदारांकडुन (कामासाठीच्या पुर्वपात्रता अटी टेंडर सेट मध्ये नमुद केल्यानुसार) करून घ्यावयाची आहेत.
ब) सदर कामांबाबत निविदा अटी/शर्ती इ. बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्वीकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकिट पद्धतीने मागविण्यात येत आहेत.
ड) ऑनलाईन निविदा प्रक्रीयेबाबतची संपूर्ण माहिती/प्रशिक्षण टेंडर सेल विभाग पुणे महानगरपालिका येथे मिळेल.
ई) कार्यालयीन आदेश क्र. अतीमआ (वि)/३२ दिनांक २२/०४/२०१६ नुसार बयाणा रक्कम इ.सी.एस./आर.टी.जी.एस./एन.ई.एफ.टी. सुविधेमार्फतच स्विकारण्यात येणार आहे.

सही/-
कार्यकारी अभियंता (यांत्रिकी)
मोटार वाहन विभाग
पुणे महानगरपालिका

थोडक्यात पण महत्वाचे



चिंचवडमधील कुणाल मार्केटच्या पार्किंगमध्ये आग; जीवितहानी टळली

पिंपरी: दैनिक संध्या

चिंचवड येथील चाफेकर चौक परिसरातील कुणाल मार्केटच्या पार्किंगमध्ये गुरुवार (दि.२९) मध्यरात्री पावणे दोनच्या सुमारास आग लागल्याची घटना घडली. घटनेची माहिती मिळताच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने तातडीने घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. यावेळी अग्निशमन दलाच्या जवानांनी टेरेसवर अडकलेल्या सुमारे १५ नागरिकांची सुखरूप सुटका केली. यामध्ये महिला, पुरुष, ज्येष्ठ नागरिक व काही रु ग्णांचा समावेश होता. अग्निशमन दलाच्या तत्पर बचाव कार्यामुळे येथे कोणतीही जीवितहानी होण्यापासून टळली. सदर घटनेदरम्यान जखमी झालेल्या एका व्यक्तीला तात्काळ तालेरा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. आगीची माहिती मिळताच मुख्य अग्निशमन केंद्रासह प्राधिकरण, थेरगाव आणि नेहरूनगर अग्निशमन केंद्रांमधून एकूण ४ अग्निशमन वाहने घटनास्थळी रवाना करण्यात आली. अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून परिस्थिती हाताळण्यासाठी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक कार्यवाही केली. या आगीदरम्यान पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या १७ दुचाकी, २ चारचाकी वाहने, एक सायकल तसेच काही वायरिंग साहित्याचे जळून नुकसान झाले.

वापरात नसलेल्या सुस्थितीतील वस्तू गरजूंना देण्याचे महापालिकेचे आवाहन

पिंपरी: दैनिक संध्या

दिवाळीनिमित्त घरांची साफसफाई करताना वापरात नसलेल्या; मात्र सुस्थितीत असलेल्या वस्तूंचा पुनर्वापर व्हावा आणि त्या गरजू व्यक्तींपर्यंत पोहोचाव्यात, या उद्देशाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभाग व स्वच्छ संस्थेच्या संयुक्त विद्यमाने 'आर.आर.आर. (रिड्यूस, रीयूज, रिसायकल) कलेक्शन ड्राइव्ह' राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत ३१ ऑक्टोबर आणि १ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत शहरातील गृहनिर्माण संस्थामध्ये वस्तू संकलन मोहीम आयोजित करण्यात आली आहे. दिवाळी निमित्त अनेक घरांमध्ये साफसफाई केली जाते. या वेळी कपडे, पुस्तके, शैक्षणिक साहित्य, खेळणी, भांडी, चादरी, पडदे, फर्निचर तसेच वापरण्यायोग्य इलेक्ट्रॉनिक वस्तू बाजूला काढल्या जातात. या वस्तू फेकून न देता त्यांचा पुनर्वापर व्हावा आणि गरजू नागरिकांना त्यांचा लाभ मिळावा, यासाठी महापालिकेच्या आरोग्य विभागाने या विशेष मोहिमेचे आयोजन केले आहे. महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले, की "कचऱ्याचे प्रमाण कमी करण्यासाठी वस्तूंचा पुनर्वापर आणि संसाधनांचा सुयोग्य वापर महत्त्वाचा आहे. वापरण्यायोग्य वस्तू थेट कचऱ्यात टाकण्याऐवजी त्यांचा पुनर्वापर केल्यास पर्यावरणावरील ताण कमी होण्यास मदत होते. नागरिकांनी आर.आर.आर. कलेक्शन ड्राइव्हमध्ये सक्रिय सहभाग नोंदवून स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक शहर घडविण्यास हातभार लावावा."

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी कोणत्याही भेटवस्तू स्वीकारू नयेत

पिंपरी: दैनिक संध्या

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कोणत्याही अधिकारी किंवा कर्मचाऱ्याने नागरिक, कंत्राटदार (ठेकेदार) अथवा कोणत्याही संस्थांकडून कोणत्याही प्रकारच्या भेटवस्तू किंवा देणग्या स्वीकारू नयेत, असे आदेश आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिले आहेत. याबाबत त्यांच्या स्वाक्षरीने परिपत्रक जारी करण्यात आले आहे. महापालिका अधिकारी, कर्मचाऱ्यांनी नागरिक, कंत्राटदार अथवा कोणत्याही संस्थांकडून भेटवस्तू किंवा देणगी स्वीकारल्याचे आढळून आल्यास संबंधितांविरुद्ध शिस्तभंगाची कडक कारवाई केली जाईल, असेही परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे. प्रभावी आणि लोकाभिमुख प्रशासन व्यवस्थेसाठी प्रत्येक अधिकारी आणि कर्मचाऱ्याने नियमांचे काटेकोरपणे पालन करणे हे प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याचे कर्तव्य आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील कलम १२ नुसार कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याने कोणतीही देणगी (भेटवस्तू) स्वतः स्वीकारता कामा नये किंवा त्याच्या कोणत्याही कुटुंबीयाला किंवा त्याच्या वतीने काम करणाऱ्या व्यक्तीला देणगी (भेटवस्तू) स्वीकारण्यास परवानगी देता कामा नये. तसेच, या कलमातील टिप-२ नुसार शासकीय कर्मचाऱ्याने त्याच्याशी कार्यालयीन व्यवहार असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीकडून किंवा औद्योगिक किंवा वाणिज्यिक संस्थांकडून, संघटनांकडून वारंवार केला जाणारा पाहुणचार स्वीकारण्याचे टाळावे, असे स्पष्ट निर्देश दिलेले आहेत. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील कलम १२ या नियमाच्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांनी नागरिक, ठेकेदार अथवा अन्य कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थांकडून भेटवस्तू (Gifts) किंवा देणग्या स्वीकारू नयेत. किंवा त्यांच्या कोणत्याही कुटुंबीयाला किंवा त्यांच्या वतीने काम करणाऱ्या व्यक्तीला देणगी किंवा भेटवस्तू स्वीकारण्यास परवानगी देऊ नये. तसेच, सुरक्षा विभागानेदेखील महापालिकेच्या कार्यालयात भेटवस्तू घेऊन येणाऱ्यांना कार्यालयात जाण्यापासून मज्जाव करावा.

नगरसेवक स्वेच्छा निधीतून विकासकामे करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे जाहीर

पिंपरी: दैनिक संध्या

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्षेत्रातील प्रभागस्तरावर स्थानिक, तातडीच्या आणि नागरी हिताच्या पायाभूत विकासकामांना गती देण्यासाठी नगरसेवक स्वेच्छा निधीच्या विनियोगाबाबत मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करण्यात आली आहेत. महापालिकेच्या लेखा व वित्त विभागामार्फत यासंदर्भातील परिपत्रक जारी करण्यात आले असून, निधीचा वापर करताना कामांचे महत्त्व, तातडी आणि नागरिकांना होणारा लाभ विचारात घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. नगरसेवक स्वेच्छा निधीतून कामे सुचविताना एकत्रित मोठे काम, एकाच प्रभागातील विविध ठिकाणी लहान कामे किंवा बहुसदस्यीय प्रभागात एकत्रितपणे मोठे काम अशा पर्यायांचा विचार करता येणार आहे. संबंधित कामांसाठी अर्थसंकल्पात प्रत्येक नगरसेवकासाठी मंजूर असलेल्या निधीच्या मर्यादेतच खर्च करता येईल. एकापेक्षा अधिक नगरसेवकांना एकत्रित काम करावयाचे असल्यास निधीचे एकत्रीकरण सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने करता येणार आहे. नगरसेवकांनी सुचविलेल्या कामांचा अर्थसंकल्पात समावेश करण्यापूर्वी आवश्यक प्रशासकीय मान्यता घेणे बंधनकारक असेल. २५ लाख रुपयांपर्यंतच्या प्रस्तावांना नियमानुसार अतिरिक्त आयुक्तांकडून प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याची तरतूद आहे. २५ लाख रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या प्रस्तावांसाठी स्थायी समितीची पूर्वमान्यता आवश्यक राहील. संबंधित विभागांनी विहित कार्यपद्धतीनुसार पुढील कार्यवाही करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत.

नवीन क्षेत्रीय कार्यालय सुरू, मात्र मनुष्यबळ आणि संसाधनांचा पत्ता नाही!

कचरा संकलन आणि स्वच्छतेच्या प्रश्नावर तातडीने कार्यवाहीची नगरसेवक राहुल कलाटे यांची मागणी; महापालिका आयुक्तांना निवेदन

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने वाढत्या लोकसंख्येच्या गरजा लक्षात घेऊन नवीन क्षेत्रीय कार्यालये सुरू केली असली, तरी या कार्यालयांना आवश्यक मनुष्यबळ, वाहने आणि इतर संसाधने उपलब्ध करून देण्यात आलेली नाहीत. परिणामी, आमच्या रायगड (ज) क्षेत्रीय कार्यालय परिसरात कचरा संकलन आणि स्वच्छता व्यवस्थेवर विपरीत परिणाम होत असल्याचे मांडत यावर तत्काळ कार्यवाही करण्याचे निवेदन भाजपा नगरसेवक राहुल तानाजी कलाटे यांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे दिले आहे.

मोशी येथील कचरा डेपोतील दुर्घटनेला जवळपास तीन महिने उलटूनही रायगड (ज) क्षेत्रीय कार्यालय परिसरातील कचरा संकलन कामकाज पूर्णपणे सुरळीत झालेले नसल्याचे राहुल कलाटे यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे. कचरा खाली करण्यासाठी वाहनांना चार ते पाच तास लागतात. तर अपुऱ्या वाहन संख्येमुळे कचरा संकलनाच्या फेऱ्या कमी होत आहेत. तसेच, संबंधित ठेकेदारांकडून आवश्यक वाहने वेळेत उपलब्ध होत नसल्याने कचरा संकलन आणि स्वच्छता व्यवस्थेवर विपरीत परिणाम होत असल्याचे कलाटे यांनी निदर्शनास आणून दिले आहे.

गंभीर समस्या निर्माण होत आहे

या भागात नागरीकरण वाढत असताना सांडपाणी प्रक्रिया करणारे (STP) प्रकल्प अपुरे आहेत. परिणामी, मैलामिश्रित सांडपाण्याची योग्य प्रक्रिया न होता ते नाले आणि नैसर्गिक जलप्रवाहांमध्ये सोडले जाण्याची गंभीर समस्या निर्माण होत आहे. यामुळे परिसरातील पर्यावरण, जलस्रोत आणि नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होत आहे. त्यामुळे पुरेशा क्षमतेचे STP प्रकल्प उभारावेत, अस्तित्वातील प्रकल्पांची क्षमता वाढवावी आणि सांडपाण्यावर प्रक्रिया न करता ते सोडले जाणार नाही, याची प्रशासनाने कठोर दक्षता घ्यावी, अशी मागणी नगरसेवक राहुल कलाटे यांनी केली आहे.

कलाटे यांच्या मांडणीनुसार रायगड क्षेत्रीय कार्यालय परिसरात प्रभाग क्रमांक १६, २५ आणि २६ यांचा समावेश असून, तीन लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या या क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत वाकड, ताथवडे, पुनावळे, पिंपळे निलख, रावेत, किवळे आणि मामुर्डी या झपाट्याने विकसित होणाऱ्या परिसराचा समावेश आहे. मात्र, या वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत कचरा संकलनासाठी आवश्यक



वाहनांची संख्या, स्वच्छता कर्मचाऱ्यांचे मनुष्यबळ आणि इतर सुविधा अपुऱ्या पडत असल्याने अनेक सोसायट्यांमधून नियमित कचरा संकलन होत नसल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत.

परिणामी, परिसरात कचरा साचणे आणि दुर्गंधी पसरणे यांसारख्या समस्या निर्माण होत आहेत. यातून 'स्वच्छ भारत' या मूळ उद्देशालाच हरताळ फासला जात आहे.

नवीन कार्यालये सुरू करून उपयोग काय, जर त्यांना आवश्यक साधनेच उपलब्ध नसतील? असा सवाल उपस्थित करत राहुल कलाटे यांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. क्षेत्रीय कार्यालयांची निर्मिती ही केवळ प्रशासकीय रचना न राहता नागरिकांना वेळेत आणि प्रभावी सेवा देणारी यंत्रणा बनली पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली.

वाढत्या लोकसंख्येचा आणि नागरीकरणाचा विचार करून संबंधित क्षेत्रीय कार्यालयांना आवश्यक प्रमाणात घंटागाड्या, कचरा संकलनासाठी वाहने, स्वच्छता कर्मचारी आणि इतर यंत्रसामग्री तातडीने उपलब्ध करून द्यावी. तसेच, कचरा संकलन करणाऱ्या वाहनांच्या फेऱ्या वाढवाव्यात, संबंधित ठेकेदारांच्या कामकाजावर नियमित देखरेख ठेवावी आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

कामगार नेते यशवंतभाऊ भोसले यांची "विनम्र अभियान पदयात्रा" यशस्वी

■ पिंपरी(दै. संध्या)



राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे संस्थापक अध्यक्ष तथा कामगार नेते यशवंतभाऊ भोसले यांच्या नेतृत्वाखाली पिंपरी चिंचवड महानगरपालिकेवर "विनम्र अभियान पदयात्रा" काढण्यात आली. यावेळी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवी लांडगे यांची महापौर कार्यालयात भेट घेऊन कंत्राटी व मानधनावरील कर्मचाऱ्यांच्या दिवाळी बोनस आणि वेतनासंदर्भात चर्चा केली. यावेळी कामगारांना २०२५-२६ या वर्षाचा बोनस आणि मासिक वेतन दिवाळीपूर्वी, म्हणजेच ३ नोव्हेंबर २०२६ च्या आत अदा करण्यात यावे अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. महापौर रवी लांडगे यांनी या मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद देत बैठकीला उपस्थित असलेले संबंधित मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप यांना तातडीने कार्यवाही करून बोनस दिवाळीपूर्वी अदा करण्याचे परिपत्रक काढण्याच्या सूचना दिल्या.

भिमसृष्टीतील भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभियान पदयात्रेला सुरुवात करण्यात आली. यावेळी हजारो कामगार सहभागी झाले होते.यावेळी परिसर कामगाराच्या घोषणांनी दणाणून गेला.

कामगार नेते यशवंतभाऊ भोसले यांनी विनम्र अभियान पदयात्रे दरम्यान महापौर रवी लांडगे यांना निवेदन दिले. त्या निवेदनात त्यांनी आरोग्य विभागातील सफाई कर्मचारी वाहन चालक वैद्यकीय मधील स्वच्छता सेवक,वार्ड बॉय,नर्सेस, तांत्रिक कर्मचारी तसेच वैद्यकीय अधिकारी उद्यान विभाग मधील कर्मचारी, अग्निशमन विभागातील वाहनचालक व अग्निशमन कर्मचारी, पालिकेच्या सर्व शाळांमधील स्वच्छता सेवक शिपाई व इतर कर्मचारी, स्मशानामधील सर्व कर्मचारी, पाणीपुरवठा व जलवाहिनी विभाग मधील सर्व कर्मचारी सर्व प्रभागांमध्ये काम करणारे कंत्राटी पद्धतीवर दाखवण्यात आलेल्या सुमारे 4500 कर्मचाऱ्यांना समान काम समान वेतन देण्यात यावे.महापालिकेने रक्कम रुपये पाच लाखापर्यंतचा परिवारासह विमा उतरावावा.कर्मचाऱ्याचा अपघाती अथवा आजारी पडून मृत्यू झाल्यास वारसदारास रक्कम रुपये 25 लाख भरपाई पोटी देण्यात यावेत.तसेच अनुकंपा तत्वावर वारसदार यास महापालिकेत नोकरी देण्यात यावी या कायदेशीर मागण्यांना मान्यता द्यावी.

यावेळी महापौर रवी लांडगे म्हणाले की, कामगार नेते यशवंतभाऊ भोसले यांनी कामगारांच्या न्यायासाठी आणि हक्कांसाठी आयुष्यभर प्रयत्न केले आहेत.

एस. बी. पाटील पब्लिक स्कूल येथे कौशल्य बोध विकास मेळावा संपन्न

■ पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट च्या रावेत येथील एस. बी. पाटील पब्लिक स्कूल मध्ये केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ कौशल्य शिक्षण विभाग च्या वतीने कौशल्य बोध क्षमता विकास मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी प्रतिभा इंटरनॅशनल स्कूल च्या वृंदा मुलतानी जोशी, ब्लूमिंग डेल इंटरनॅशनल स्कूल चे डॉ. हितेश शर्मा, एस. बी. पाटील पब्लिक स्कूल च्या प्राचार्या डॉ. बिंदू सैनी, उपप्राचार्या पद्मावती बंडा, मुख्याध्यापिका शुभांगी कुलकर्णी व शिक्षक वर्ग आदी उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर आणि कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी सहभागी शिक्षकांना शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमात पुण्यातील विविध शाळांमधील १०० शिक्षक, मुख्याध्यापक आणि शिक्षणतज्ज्ञ आदींनी सहभाग घेतला होता. यामध्ये इयत्ता सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी कौशल्य शिक्षणाची प्रभावी अंमलबजावणी करणे याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. कौशल बोध या अभ्यासक्रमाची संकल्पना स्पष्ट करताना कृती आधारित व अनुभव आधारित शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये व्यावहारिक कौशल्ये, सर्जनशीलता आणि समस्या सोडविण्याची क्षमता विकसित करण्यावर त्यांनी विशेष भर दिला.

छठपूजेसाठी सोयीसुविधा आणि पोलीस बंदोबस्त द्या

■ पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी-चिंचवड शहरात १५ आणि १६ नोव्हेंबर २०२६ रोजी साजऱ्या होणाऱ्या छठपूजेच्या पार्श्वभूमीवर नदीघाट परिसरात स्वच्छता, प्रकाश व्यवस्था, पिण्याचे पाणी, अग्निशमन दल, स्टेज तसेच आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. तसेच भाविकांच्या सुरक्षिततेसाठी पुरेसा पोलीस बंदोबस्त तैनात करावा, अशी मागणी हनुमान मित्र मंडळाचे अध्यक्ष विजय आर. गुप्ता यांनी महापालिका आयुक्त आणि पोलीस आयुक्त यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

आयुक्तांना दिलेल्या निवेदनात विजय गुप्ता यांनी म्हटले आहे कि, "पिंपरी-चिंचवड शहरात गेल्या अनेक वर्षांपासून विविध नदीघाटांवर छठपूजेचे आयोजन केले जाते. शहरात उत्तर भारतीय समाजाची मोठी लोकसंख्या वास्तव्यास असून, लाखो भाविक या धार्मिक उत्सवात सहभागी होतात. मात्र, घाट परिसरात आवश्यक सुविधा अपुऱ्या पडत असल्याने भाविकांची गैरसोय होत असल्याचे गुप्ता यांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले आहे.

पवना नदीकिनारी, बिर्ला हॉस्पिटल रोड येथील हॉटेल रिव्हर व्ह्यूजवळील गणपती विसर्जन घाट परिसरात छठपूजेचे आयोजन करण्यात येणार आहे. या वेळी धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमही होणार आहेत. त्यामुळे संबंधित प्रभागांतील घाटांची स्वच्छता, पुरेशी प्रकाश व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सोय, अग्निशमन दलाची तयारी आणि आवश्यक व्यासपीठाची व्यवस्था महापालिकेने करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

ड्रायफ्रूट व्यापाऱ्याला शस्त्राचा धाक दाखवून लुटले

■ पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी-चिंचवड शहरात गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ होत असतानाच पिंपरीतील शकुन चौक परिसरात सशस्त्र लुटीची घटना घडली आहे. दुकान बंद करून घरी जाणाऱ्या ४५ वर्षीय ड्रायफ्रूट व्यापाऱ्याला धारदार शस्त्राचा धाक दाखवून पाच अज्ञात तरुणांनी तब्बल चार लाख रुपयांची रोकड आणि दुचाकी लुटून नेली. गुरुवारी (दि.२९ ऑक्टोबर) रात्री घडलेल्या या घटनेमुळे व्यापारी वर्गात खळबळ उडाली आहे.

किशन धामेजा असे लुटीला बळी पडलेल्या व्यापाऱ्याचे नाव आहे. ते दुकान बंद करून घरी जात असताना दुचाकीवरून आलेल्या पाच अज्ञात तरुणांनी त्यांना अडवले. त्यानंतर धारदार शस्त्राचा धाक दाखवून त्यांच्याकडील चार लाख रुपयांची रोकड आणि दुचाकी जबरदस्तीने लुटून आरोपींनी घटनास्थळावरून पळ काढला.

या लुटीची संपूर्ण घटना परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. या प्रकरणी पिंपरी पोलीस ठाण्यात पाच अज्ञात आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, पिंपरी मार्केट परिसरात व्यापाऱ्यांना लक्ष्य करून घडलेल्या या घटनेमुळे व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रात्रीच्या वेळी दुकान बंद करून घरी जाणाऱ्या व्यापाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, पोलिसांनी आरोपींचा तातडीने शोध घेऊन त्यांना अटक करावी, अशी मागणी व्यापारी वर्गातून होत आहे.

भाजपचा सांगवी पोलिसांवर दबाव;सत्ताधारी विरुद्ध सत्य असा संघर्ष या शहरात सुरू : बनसोडे

■ सांगवी (दै. संध्या)



सांगवी येथील संविधान चौकातील संविधान शिल्प आणि भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेची बेकायदेशीररीत्या तोडफोड करून हटविल्याप्रकरणी काँग्रेस आणि समविचारी संघटनांचे ठिय्या आंदोलन आठव्या दिवशीही सुरूच आहे. या घटनेला १५ दिवस उलटूनही संबंधितांवर कायद्यानुसार कारवाई झालेली नसल्याचा आरोप करत सांगवी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र कोळी यांच्यावर भारतीय जनता पार्टीचा दबाव असल्याचे दिसून येते त्यामुळे शहरात आता सत्ताधारी विरुद्ध सत्य असा संघर्ष सुरू झाला आहे असे मत काँग्रेसचे शहराध्यक्ष नरेंद्र बनसोडे यांनी व्यक्त केले. त्यांनी पोलीस प्रशासन आणि सत्ताधारी भाजपवर जोरदार टीका केली. संविधानाच्या सर्वोच्च दस्तऐवजाचा सन्मान आणि संविधान शिल्पाच्या पुनर्स्थापनेसाठी सुरू असलेला हा लढा थांबणार नसल्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. यावेळी बनसोडे म्हणाले की,सांगवी येथील संविधान चौकातील संविधानाची प्रास्ताविका आणि स्मारक बिनपरवाना, बेकायदेशीररीत्या हटविण्यात आले. जेसीबीच्या साहाय्याने हे स्मारक उद्ध्वस्त करण्यात आले.या घटनेला आज १५ दिवस झाले असून, आंदोलनाचा आठवा दिवस सुरू आहे.

मात्र, उपलब्ध कायद्यानुसार संबंधितांवर कारवाई करण्यात पोलीस प्रशासन अद्याप असमर्थ ठरल्याचे दिसत आहे.देशाच्या सर्वोच्च दस्तऐवजाचा भाग असलेल्या संविधानाच्या प्रास्ताविकेची बेशरमपणे तोडफोड करणाऱ्यांवर कारवाई होत नसेल, तर त्यांना संविधानद्रोह आणि जनद्रोह करण्यासाठी खुली सूट दिली आहे का? भारतीय जनता पक्षासाठी देशात वेगळी न्यायसंहिता आहे का? संबंधितांवर कारवाई का केली जात नाही?

आयुक्तांकडून भेटीसाठी वेळ दिला जात नाही

गेल्या दोन दिवसांपासून पोलीस आयुक्तांची भेट घेण्यासाठी वेळ मागितला जात आहे. मात्र, आयुक्तांकडून भेटीसाठी वेळ दिला जात नाही.आमच्या प्रश्नांची उत्तरे प्रशासनाकडे नाहीत.संविधानाने निर्माण केलेली व्यवस्था आणि त्याच संविधानाच्या प्रास्ताविकेवर हल्ला करणाऱ्यांना ही व्यवस्था का रोखू शकत नाही? कारण या घटनेमागे मनुवाद आणि ठराविक वर्चस्ववाद आहे. परंतु सांगवीकर आणि स्थानिक रहिवासी आमच्या सोबत आहे याची पोलीस प्रशासनाने दखल घ्यावी. सांगवी परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा एकही पूर्णाकृती पुतळा नसल्याचे सांगत, या परिसरात त्यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा.

थोडक्यात पण महत्वाचे



रायफल शूटिंगमध्ये काकडे राज्यात प्रथम

नारायणगाव: दैनिक संध्या

समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ ज्युनिअर कॉलेज, बेल्हे-बांगरवाडी येथील विद्यार्थिनी इशिता काकडे हिने राज्यस्तरीय शालेय रायफल शूटिंग स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून उल्लेखनीय कामगिरी केली आहे. नागपूर येथे झालेल्या या स्पर्धेत तिने ओपन साईट प्रकारात अव्वल स्थान पटकावले. या यशामुळे तिची राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे. इशिताला क्रीडा संचालक एच. पी. नरसुडे, क्रीडा शिक्षक सुरेश काकडे, विनायक वव्हाडी आणि किशोर काकडे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. तिच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष वसंत शेळके, उपाध्यक्ष माऊली शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके,सचिव विवेक शेळके, माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहल शेळके, ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या वैशाली आहेर,कॅम्पस डायरेक्टर प्रा. राजीव सावंत, आणि प्रशासकीय अधिकारी प्रा. प्रदीप गाडेकर यांनी अभिनंदन केले. तसेच आगामी राष्ट्रीय स्पर्धेसाठी तिला शुभेच्छा दिल्या. इशिताच्या या यशामुळे समर्थ शैक्षणिक संकुलाच्या क्रीडा क्षेत्रातील नावलौकिकात भर पडली असून, तिच्या पुढील यशस्वी वाटचालीसाठी सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

श्री. चक्रपाणि प्रभु अवतार दिन सोहळ्याचे आयोजन

कोरेगावमुळ : दैनिक संध्या

अखिल मानवमात्राच्या उद्धारासाठी व्यक्त झालेल्या पूर्ण परब्रह्म परमेश्वर श्री चक्रपाणि प्रभू यांच्या अवतरण दिनानिमित्त मंगळवार दि. ३ नोव्हेंबर २०२६ रोजी श्रीक्षेत्र फलटण येथे भव्य धार्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. पहाटे ५ वा. जन्मकाळ, जन्मस्थान मंदिर फलटण, सकाळी ६ वा. जन्मकाळ, श्रीचक्रपाणि महानुभाव मठ. सकाळी ८ वा. श्री चक्रपाणि स्त्रोत्र पारायण, सकाळी ९ वा. ध्वजारोहण, सकाळी १० वा. धर्मसभा. दुपारी १२ वा. आरती व महाप्रसाद असं कार्यक्रमाचे स्वरुप असणार आहे. या सोहळ्यास विविध ठिकाणांहून संत-महंतांची उपस्थिती लाभणार असून, भाविकांनी सहकुटुंब उपस्थित राहून धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. या निमित्ताने पहाटे ५ वाजता श्री चक्रपाणि जन्मस्थान मंदिर येथे, तर सकाळी ६ वाजता श्री चक्रपाणि महानुभाव मठ, फलटण येथे धार्मिक कार्यक्रम संपन्न होणार आहेत. या सोहळ्यास विविध संत-महंत उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाला कविश्वर कुलाचार्य आचार्यप्रवर प.पू.प.म. श्री.विद्वांस बाबाजी शास्त्री (फलटण), चिंतनीजनक आचार्यप्रवर प.पू.प.म. श्री.बाभुळगावकर बाबाजी शास्त्री (लाडगाव), उपाध्याय कुलभूषण आचार्यप्रवर प.पू.प.म.श्री.सातारकर बाबाजी (सातारा), कविश्वर कुलभूषण आचार्यप्रवर प.पू.प.म.श्री.राहेरकर बाबाजी (तरडगाव), महंत श्री.कापुसतळणीकर बाबाजी (फलटण), श्री.सुदामराज बाबाजी विद्वांस (फलटण) तसेच श्री.प्रकाशमामाजी विद्वांस (फलटण) यांच्यासह महानुभाव संप्रदायातील संत-महंतांची उपस्थिती राहणार आहे. श्रीकृष्ण देवस्थान ट्रस्ट, फलटण यांच्या वतीने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे आयोजन श्रीकृष्ण देवस्थान ट्रस्ट व आचार्य प्रवर प पु प म श्री.मुकुंदराज बाबा बिडकर यांच्या वतीने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच सातारा जिल्हा महानुभाव परिषदेच्या सहभागातून हा धार्मिक सोहळा पार पडणार आहे. श्री चक्रपाणि प्रभूंच्या अवतरण दिनानिमित्त आयोजित या सोहळ्याला महानुभाव संप्रदायातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्रीप्रभूंच्या दर्शनाचा व धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



हृदय शस्त्रक्रियेसाठी मदतीचा धनादेश

चाकण : दैनिक संध्या

चाकण नगरपरिषदेचे नगरसेवक स्व. जीवन आनंदराव सोनवणे यांच्या स्मृती प्रित्यर्थ पुणे शहरातील दोन व एक बीड जिल्ह्यातील एकूण तीन मुलांच्या हृदय शस्त्रक्रियेसाठी आर्थिक मदतीचे प्रत्येकी दहा हजार रुपये प्रमाणे तीन धनादेश संबंधितांच्या पालकांकडे सुपूर्त करण्यात आले. याप्रसंगी उद्योजक गोरक्षनाथ कांडगे, प्रशांत गोलांडे, नाजीम सिकीलकर, बिपिन रासकर, रोनक गोरे, राजेंद्र शिंदे, प्रवीण गोरे आदी उपस्थित होते. सदर मदतीचा धनादेश रुग्णांच्या नातेवाईकांना वरील उपस्थित मान्यवरांच्या हस्ते देण्यात आला.

काळेपडळमध्ये दोघा तरुणांकडून सव्वातीन लाखांचे मेफेड्रोन जप्त

काळेपडळ : दैनिक संध्या

पोलिसांनी काळेपडळ परिसरातून दोघांना ताब्यात घेत मेफेड्रोन (एमडी) अमली पदार्थांसह मोबाईल आणि दुचाकी असा सुमारे चार लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. गुन्हे शाखेच्या अमली पदार्थविरोधी पथकाने ही कारवाई केली. मुशरफ इसाक शेख (वय २५) आणि सोहेल बाबूलाल शेख (वय २५, दोघे रा. नेहरू पार्क, काळेपडळ) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. या प्रकरणी पोलिस अंमलदार अमोल सरडे यांनी काळेपडळ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरून एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, काळेपडळ परिसरातील समृद्धी चौक रस्त्यालगत रेल्वे लाइनच्या भिंतीलगत दोन तरुण संशयास्पदरीत्या थांबल्याचे पथकाच्या निदर्शनास आले. पोलिसांनी झडती घेतली असता, मुशरफ शेख आणि सोहेल शेख याच्याकडे एकूण १११ ग्रॅम मेफेड्रोन आढळून आले. आरोपींनी हा अमली पदार्थ विक्रीसाठी आणल्याचे तपासात समोर आले. पोलिस उपायुक्त हसन गौहर आणि सहाय्यक आयुक्त शंकर खटके यांच्या सूचनेनुसार वरिष्ठ पोलिस निरीक्षक तृप्ती सोनवणे, पोलिस उपनिरीक्षक योगेश कोतकर, आशा भिंगारे आणि पथकाने ही कारवाई केली.



सह्याद्रीचे जंगल बचावासाठी चाकणमध्ये धरणे आंदोलन

प्रस्तावित प्रकल्प रद्द करण्याची मागणी, सरकारवर कडाडून टीका

■ चाकण (दै. संध्या)

सह्याद्री घाटातील जंगल, वनसंपदा आणि जैवविविधतेच्या संरक्षणासाठी खेड तालुक्यातील सर्वपक्षीय नागरिकांच्या वतीने चाकण येथे धरणे आंदोलन करण्यात आले. प्रस्तावित प्रकल्पामुळे मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होऊन वन्यजीवांचा अधिवास धोक्यात येण्याची, तसेच भविष्यात पाणीटंचाईची समस्या गंभीर होण्याची भीती आंदोलकांनी व्यक्त केली. हा प्रकल्प तातडीने रद्द करण्याची मागणी करत आंदोलकांनी शासनाच्या धोरणांवर, लोकप्रतिनिधींच्या भूमिकेवर आणि उद्योजकांच्या फायद्यासाठी निसर्गाची हानी होत असल्याच्या मुद्द्यावरून तीव्र नाराजी व्यक्त केली. आंदोलना दरम्यान काँग्रेसचे चाकण शहराध्यक्ष बाळासाहेब गायकवाड यांनी लोकप्रतिनिधींच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. "हा प्रकल्प जनतेच्या हिताचा असता, तर तो दोन व्यक्तींनी संपूर्ण महाराष्ट्राच्या माथी मारला असता का? आंबेगाव मधील लोकप्रतिनिधी काही बोलत नाहीत. तर आमच्या लोकप्रतिनिधींनीही मूग गिळले आहे. प्रकल्प रद्द केला नाही, तर चाकण शहरात तीव्र आंदोलन छेडले जाईल," असा इशारा त्यांनी दिला.

उद्योजक सुभाष डोळस यांनी यावेळी या परिसरात २३५ पक्षीप्रजातींची नोंद असल्याचे सांगत वृक्षतोड झाल्यास या पक्ष्यांचे आणि अन्य वन्यजीवांचे अस्तित्व धोक्यात येईल, अशी चिंता व्यक्त केली. जंगलात राहणारे नागरिक वन्यजीवांसोबत सहजीवन जगत असल्याचे सांगून त्यांनी आंदोलकांवर पुढाऱ्यांकडून दबाव टाकला जात असल्याचा आरोप केला.

माजी नगराध्यक्ष शेखर घोगरे यांनी शासनाच्या वृक्षलागवड धोरणावर टीका केली. वनमंत्री असताना सुधीर मुनगंटीवार यांनी केलेल्या वृक्षलागवडीपैकी किती झाडे प्रत्यक्षात जगली, याची माहिती शासनाने द्यावी, अशी मागणी त्यांनी केली. नगरसेवक धीरज मुटके यांनी सह्याद्रीच्या पर्यावरणावर घाला घातला जात असल्याचे सांगत भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी जंगलांचे संरक्षण करणे आवश्यक असल्याचे मत मांडले. युवा पिढीने या लढ्यात सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले. साहेबराव जाधव यांनी आ.बाबाजी काळे यांचा जाहीर निषेध करत, त्यांच्या गावात सौरऊर्जा प्रकल्पासाठी चार एकरांवरील झाडे बेकायदेशीररीत्या तोडली जात असल्याचा आरोप केला. या आरोपांची संबंधित प्रशासनाने चौकशी करावी, अशी मागणी आंदोलनाच्या निमित्ताने पुढे आली. राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अंकुश राक्षे यांनी यावेळी प्रस्तावित प्रकल्पासाठी निवडलेल्या जागेवर प्रश्न उपस्थित केले. लाखो पक्ष्यांची घरटी नष्ट होण्याची भीती व्यक्त करत त्यांनी परिसरातील शेकरूंच्या अस्तित्वाचाही मुद्दा मांडला. त्यांच्या म्हणण्यानुसार, परिसरात २,३०५ शेकरू आहेत. पवनचक्की प्रकल्पासाठी एका झाडामागे तीन झाडे लावण्याची अट होती, तर प्रत्यक्षात किती झाडे लावली गेली, याचा हिशेब शासनाने द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. युवा नेते सुधीर मुंगसे यांनी उद्योजकांच्या फायद्यासाठी निसर्गाची हानी केली जात असल्याचा आरोप केला. इलेक्ट्रोल बाँडच्या माध्यमातून एका सरकारला ९७ कोटी रुपये देण्यात आल्याचा दावा करत त्यांनी राजकीय आणि औद्योगिक हितसंबंधांवर प्रश्न उपस्थित केले. डेटा सेंटरसाठी मोठ्या प्रमाणावर पाण्याची गरज भासते, असे सांगत त्यांनी या प्रकल्पाच्या पर्यावरणीय परिणामांचा सखोल विचार करण्याची मागणी केली. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष देवदत्त निकम यांनीही या प्रकल्पाला रोखण्यासाठी आतापर्यंत कोणी प्रयत्न केले नाहीत, असा सवाल उपस्थित केला. यशवंतराव चव्हाण यांच्या कार्याचा संदर्भ देत त्यांनी विकास कामांमध्ये पर्यावरणाचे महत्त्व अधोरेखित केले. रस्त्यांच्या कडेला लावलेली झाडे आज कुठे आहेत, असा प्रश्न उपस्थित करत जंगलांचे संरक्षण करण्याचे मोठे काम आदिवासी बांधवांनी केले असल्याचे त्यांनी सांगितले. चाकण येथील या धरणे आंदोलनात ज्येष्ठ नेते देवदत्त निकम, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अंकुश राक्षे, उद्योजक गोरक्षनाथ कांडगे, सुरेश कांडगे, दत्तात्रय जाधव, भगवान घोडेकर, माजी उपसभापती सतीश राक्षे, युवा नेते सुधीर मुंगसे, माजी सभापती हिरामण सातकर, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष चंद्रकांत गोरे, माजी सभापती काळूराम कड, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष राम गोरे, काँग्रेसचे शहर अध्यक्ष आनंद गायकवाड, दत्तात्रय मांडेकर, व्यापारी राम गोरे, शेखर घोगरे, धीरज मुटके, अमोल दौंडकर, सागर बनकर, जमीर काझी, मुबीन काझी आदींसह विविध पक्षांचे पदाधिकारी व पर्यावरणप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

> सह्याद्रीतील वनसंपदा आणि जैवविविधता वाचविण्यासाठी प्रकल्पाला विरोध करण्यात येणार आहे. प्रकल्पाच्या पर्यावरणीय परिणामांची सखोल तपासणी करून वृक्षतोडीबाबतची वस्तुस्थिती स्पष्ट करावी आणि जंगलांच्या संरक्षणासाठी ठोस निर्णय घ्यावा. सर्वांनी अलर्ट राहण्याची गरज आहे.
>
> - गोरक्षनाथ कांडगे,
> संचालक, चाकण पतसंस्था,.

...तर आंदोलनाची वेळ आली नसती

जंगलतोडीमुळे पावसाचे प्रमाण कमी होण्याची भीती आहे. असे प्रकल्प वाळवंटी भागात उभारावेत. आदिवासी बांधवांना हक्काची जागा मिळत नाही. मात्र उद्योजकांच्या फायद्यासाठी निसर्गाची हानी केली जात आहे, अशी टीका राक्षे यांनी केली. निसर्गाच्या ऱ्हासाचे परिणाम नेपाळ आणि केदारनाथ परिसरातील घटनांमधून दिसून आल्याचे सांगत या आंदोलनाची पहिली ठिणगी चाकणमध्ये पडली असून या लढ्याला आपला पूर्ण पाठिंबा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अजित पवार आज असते, तर आंदोलनाची वेळ आली नसती, असे मतही त्यांनी व्यक्त केले.

मुळशी तालुक्यात पिक नुकसानीचे पंचनामे तातडीने करण्याचे जिल्हाधिकारी यांचे आदेश



■ मुळशी (दै. संध्या)

तालुक्यात ऑगस्ट महिन्यापासून पावसाच्या खंडामुळे पिकांचे नुकसान झालेले आहे. अशा सर्व बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मदत देण्याकरिता शेती पिकांचे पंचमाने तातडीने करण्यात यावेत, असे आदेश पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी ता. १३ रोजी व्हि. सी. द्वारे दिले आहेत.

त्या आदेशानुसार मुळशी तालुक्यातील शेती पिकांचे नुकसानीचे गावनिहाय पंचनामे तातडीने करावेत. असे आदेश तहसीलदार विजयकुमार चोबे यांनी मुळशी तालुक्यातील संबधित गावचे ग्राम महसूल अधिकारी संबधित गावचे कृषी सहाय्यक संबधित गावचे ग्रामविकास अधिकारी यांना दिले असून, त्यांनी गावामध्ये जाऊन बाधित झालेल्या शेतीचे गावनिहाय पंचनामे करुन त्यांचे संयुक्त स्वाक्षरीने केलेल्या पंचनाम्याची प्रत तहसिल कार्यालय मुळशी येथे सादर करावेत असे तातडीचे आदेश तहसीलदार यांनी दिले आहेत. 'तालुक्यातील पावसाअभावी करपून गेलेल्या भात व इतर पिकांचे जे नुकसान झाले आहे. अशा सर्व शेतकऱ्यांना पंचनामे होणार असल्याने थोडा का होईना दिलासा मिळाला आहे.

नीरेकाठच्या गावांवर जलसंकट; इंदापूरमधील बंधारे कोरडे



■ नीरा (दै. संध्या)

नीरा नदीला पुराचे पाणी वाहून गेल्यानंतर नदीवरील बंधाऱ्यांना ढापे न टाकल्यामुळे इंदापूर आणि माळशिरस तालुक्यांतील नदीकाठच्या गावांमध्ये पाणीटंचाईचे गंभीर संकट निर्माण झाले आहे. नदीवरील जवळपास सर्वच बंधारे कोरडे पडले आहेत.

पिण्याच्या पाण्यासह जनावरांच्या पाण्याचा आणि चाऱ्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने पाण्याचे टँकर सुरू करावेत तसेच वीर धरणातून नीरा नदीत पाणी सोडून बंधारे भरून घ्यावेत, अशी मागणी शेतकरी आणि ग्रामस्थांकडून होत आहे.

नीरा नदीकाठावरील इंदापूर तालुक्यातील गिरवी, ओझरे, गोंदी, लुमेवाडी, सराटी, भगतवाडी, पिठेवाडी, चाकाटी, निरनिमगाव आदी गावांत तर माळशिरस तालुक्यातील संगम, गणेशगाव, माळीनगर, तांबवे, सवतगाव, अकलूज, चाकोरे, आनंदनगर आदी गावांतील पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा व पाणी तातडीने उपलब्ध करून द्यावे व संभाव्य अनर्थ टाळावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे. पावसाळ्यात नीरा नदीतून मोठ्या प्रमाणावर पुराचे पाणी वाहून गेले. मात्र, पूर ओसरल्यानंतर नदीवरील बंधाऱ्यांना ढापे न टाकल्यामुळे बंधाऱ्यांमध्ये पाणीसाठा टिकून राहिला नाही. परिणामी, अनेक बंधाऱ्यांतील पाणी संपून नदीपात्र कोरडेठाक पडले आहे. नदीकाठच्या गावांमध्ये पाण्याच्या उपलब्धतेचा प्रश्न निर्माण झाला असून, शेती आणि पशुधनावरही त्याचे गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे. नीरा नदीकाठच्या गावांमध्ये पाणीटंचाई वाढण्याची शक्यता लक्षात घेता प्रशासनाने परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करावी. टंचाईग्रस्त गावांमध्ये टँकर सुरू करण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी आणि वीर धरणातून पाणी सोडण्याबाबत जलसंपदा विभागाने समन्वय साधावा, अशी मागणी जोर धरत आहे. पिण्याचे पाणी, पशुधनासाठी पाणी आणि चारा उपलब्ध करून देण्यासाठी वेळीच उपाययोजना झाल्या नाहीत.

सुनिल गहिने यांना 'समाजभूषण पुरस्कार' प्रदान

■ बोरी (दै. संध्या)

मंगरूळ, ता. जुन्नर येथील स्वप्नवेध अनाथालयाच्यावतीने विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना पुरस्काराने गौरविण्यात आले. पत्रकार सुनिल गहिने यांना मान्यवरांच्या हस्ते समाजभूषण पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले.

पत्रकारिता ही केवळ बातम्या देण्यापुरती मर्यादित नसून समाजातील प्रश्नांना वाचा फोडणे, सामाजिक उपक्रमांना प्रसिद्धी देणे, गरजू व्यक्तींच्या समस्या समाजासमोर मांडणे आणि लोकहिताच्या कार्याला व्यासपीठ उपलब्ध करून देणे, अशी महत्त्वाची भूमिका पत्रकार पार पाडत असतात. या दृष्टिकोनातून पत्रकारिता आणि समाजसेवा यांचा समन्वय साधत कार्य करणाऱ्या सुनिल गहिने यांना मिळालेला हा सन्मान त्यांच्या सामाजिक कार्याला प्रोत्साहन देणारा ठरला.



ज्वारी लागवडीला प्रोत्साहन; पावसाच्या अनिश्चिततेमुळे बियाणांचे मिनीकिटचे वाटप

■ बारामती (दै. संध्या)

पावसाअभावी रब्बी हंगामातील पेरण्यांबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर कमी पाण्यात येणाऱ्या आणि पशुधनासाठी दर्जेदार चारा उपलब्ध करून देणाऱ्या ज्वारीच्या लागवडीला प्रोत्साहन देण्यासाठी जिल्ह्यात १५ हजार ८६० बियाणे मिनीकिटचे वाटप करण्यात येणार आहे. यातून ६३४ क्विंटल ज्वारीचे बियाणे उपलब्ध होणार आहे. नियमित वाटपाव्यतिरिक्त यंदा प्रथमच अतिरिक्त मिनीकिट उपलब्ध करण्यात आले आहेत. मात्र, ज्वारीचे प्रत्यक्ष क्षेत्र पेरणीपुरता पाऊस होण्यावर अवलंबून राहणार आहे. राष्ट्रीय अन्नसुरक्षा आणि पोषण उप अभियानांतर्गत रब्बी ज्वारी २०२६-२७ या योजनेतून मिनीकिटचे वितरण केले जाणार आहे. एका मिनीकिटमध्ये चार किलो बियाणे, जैविक खत आणि लागवडीविषयी मार्गदर्शन दिले जाणार आहे. परभणी सुपरमोती, फुले यशोमती आणि पीकेव्ही शक्ती या सुधारित वाणांचा त्यात समावेश आहे. महाडीबीटी पोर्टलवर 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वानुसार लाभार्थ्यांची निवड होणार असून, पात्र शेतकऱ्यांना १० नोव्हेंबरपूर्वी मिनीकिटचे वितरण केले जाणार आहे. पाण्याची अनिश्चितता आणि कमी कालावधीत तयार होणारे पीक यामुळे यंदा हरभऱ्याच्या लागवडीला प्राधान्य मिळण्याची शक्यता आहे.

जिल्ह्यात हरभऱ्याचे सरासरी क्षेत्र सुमारे २५ हजार हेक्टर असून, यंदा ते ३० ते ३५ हजार हेक्टरपर्यंत वाढू शकते. ऊसतोडीनंतर काही क्षेत्रांत हरभरा लागवड होण्याची शक्यता आहे.



थोडक्यात पण महत्वाचे



विद्यार्थिनींसाठी स्व-संरक्षण प्रशिक्षणाचा प्रस्ताव योजना ठोकळे यांच्या कडून सादर

मुंबई : दैनिक संध्या

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' आणि 'वुमन-लेड डेव्हलपमेंट' या दूरदृष्टीतून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'सक्षम व सुरक्षित महाराष्ट्र' घडवण्याच्या विचारांतून आणि मुंबई भाजप अध्यक्ष आमदार अमित साटम यांनी बाल आणि महिला सुरक्षेबाबत घेतलेल्या आग्रही भूमिकेतून प्रेरित होऊन, बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण समितीच्या अध्यक्षा राजेश्री राजेश शिरवाडकर यांना मनपा शाळांमधील इयत्ता ५ वी ते ९ वीच्या विद्यार्थिनींना स्व-संरक्षणाचे (Self-Defense) विशेष प्रशिक्षण देण्याचा प्रस्ताव मुंबई प्रदेश भाजप महिला मोर्चाच्या अध्यक्षा तथा शिक्षण समिती सदस्या योजना ठोकळे यांनी नुकताच सादर केला. मनपा शाळांमध्ये प्रामुख्याने आर्थिक व सामाजिक दृष्ट्या वंचित घटकातील मुले शिक्षण घेतात. आजच्या काळात विद्यार्थिनींची सुरक्षा, त्यांचे शारीरिक व मानसिक सक्षमीकरण आणि आत्मविश्वास वाढवणे अत्यंत गरजेचे आहे. हे प्रशिक्षण भारत सरकारच्या कौशल्य विकास मंत्रालयांतर्गत NSDC मान्यताप्राप्त संस्थेमार्फत, NSQF नुसार प्रमाणित अभ्यासक्रमाने आणि पार्श्वभूमी तपासणी झालेल्या प्रशिक्षकांकडून दिले याकडे शिक्षण समिती सदस्या योजना ठोकळे यांनी लक्ष्य वेधले आहे.



श्री क्षेत्र लेण्याद्री येथे संकष्टी चतुर्थीनिमित्त भाविकांची अलोट गर्दी

जुन्नर : दैनिक संध्या

गुरुवार, दि. २९ ऑक्टोबर २०२६ रोजी संकष्टी चतुर्थीनिमित्त अष्टविनायकांपैकी एक असलेले श्री क्षेत्र लेण्याद्री (ता.जुन्नर) येथे 'श्री गिरिजात्मज' गणपतीचे दर्शनासाठी भाविकांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. पहाटेपासूनच मंदिर परिसरात भाविकांची वर्दळ सुरू झाली होती. पुणे, अहिल्यानगर, मुंबई, ठाणे, नाशिक तसेच जुन्नर परिसरातील विविध गावांतून आलेल्या हजारो भाविक व पर्यटकांनी श्रींचे दर्शनाचा लाभ घेतला. संपूर्ण लेण्याद्री परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता. संकष्टी चतुर्थीनिमित्त 'श्री गिरिजात्मज' गणपतीच्या मूर्तीसह मंदिर परिसरात आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती. या सजावटीमुळे मंदिराच्या परिसराला विशेष धार्मिक आणि प्रसन्न स्वरूप प्राप्त झाले होते. 'श्री गिरिजात्मज' गणपतीचे दर्शनासाठी आलेल्या भाविक व पर्यटकांमध्ये मोठा उत्साह दिसून येत होता. संकष्टी चतुर्थीनिमित्त श्री लेण्याद्री गणपती देवस्थान ट्रस्टच्या वतीने सकाळी ६.१५ वाजता देवस्थानचे विश्वस्त सदाशिव ताम्हाणे यांच्या हस्ते 'श्री गिरिजात्मज' गणपतीच्या मूर्तीस विधीवत अभिषेक व महापूजा करण्यात आली. त्यानंतर भाविक व पर्यटकांकरीता श्रींचे दर्शनाची व्यवस्था करण्यात आली. मंदिरात सकाळी ७ वाजता, दुपारी १२ वाजता आणि सायंकाळी ७ वाजता श्रींची महाआरती करण्यात आली. संकष्टी चतुर्थीनिमित्त दिवसभर विविध धार्मिक विधी आणि उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. भाविक व पर्यटकांना श्रींचे दर्शन सुलभतेने घेता यावे, याकरीता देवस्थान ट्रस्टच्या वतीने नियोजनबद्ध व्यवस्था करण्यात आली होती. दर्शनासाठी येणाऱ्या भाविक व पर्यटकांना आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यावर देवस्थान प्रशासनाने भर दिला. संकष्टी चतुर्थीच्या निमित्ताने श्री क्षेत्र लेण्याद्री परिसराला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. यानिमित्त देवाचे नैवेद्याकरीता दौंड येथील विक्रम पांडुरंग दिवेकर यांनी २ कॅरेट केळींचा प्रसाद अर्पण केला.

खान्देश माळी मंडळ पिंपरी चिंचवडचा वधू वर पालक परिचय मेळावा संपन्न

पिंपरी: दैनिक संध्या

खान्देश मंडळाने सामाजिक दृष्टिकोन डोळ्यापुढे ठेवून आयोजित केलेला वधू वर पालक परिचय मेळावा हे उत्कृष्ट आयोजनाचे उदाहरण आहे. अशा मेळाव्यामुळे समाजाचा वेळ व पैसा वाचतो तसेच नागरिकांचा सामाजिक संपर्क देखील वृद्धिंगत होतो, अशा मेळाव्याची सर्व समाजाला गरज असल्याचे प्रतिपादन माजी महापौर ज्येष्ठ नगरसेवक योगेश बहल यांनी केले. खान्देश माळी मंडळ पिंपरी चिंचवड या संस्थेच्या वतीने २८ वा वधू वर पालक परिचय मेळावा पिंपरी आचार्य अत्रे रंगमंदिर येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी कामगार नेते योगेश तळेकर, नाशिक चे महात्मा फुले समता परिषद अध्यक्ष प्रकाश महाजन, पिंपरी चिंचवड माजी महापौर नगरसेवक वैशाली घोडेकर, खानदेश मंडळाचे अध्यक्ष नकुल महाजन अभिनेता डॉ. संजीव पाटील, निवृत्त अधिकारी दादाजी सोनवणे, महात्मा फुले शिक्षण संस्था भडगाव चे अध्यक्ष दीपक संभाजी महाजन, जळगाव च्या माजी नगरसेविका सरिता नेरकर, मंडळाचे माजी अध्यक्ष पी. के. महाजन, नानाभाऊ माळी, वधू वर समिती प्रमुख उदयभान पाटील, मेळाव्याचे अध्यक्ष प्रकाश महाजन आधी उपस्थित होते.

बालसुरक्षेसंदर्भात कायदेविषयक जनजागृती शिबिर उत्साहात संपन्न

■ नारायणगाव(दै. संध्या)



सुरक्षित बचपन अभियानांतर्गत सातरकवस्ती, ता. खेड येथील जिल्हा परिषद शाळा सातरकवस्ती कायदेविषयक जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई येथील मुख्य मध्यस्थी केंद्राच्या निर्देशानुसार, सुरक्षित बालपण अभियानांतर्गत विधीविषयक जनजागृती शिबिराचे आयोजन तालुका विधी सेवा समिती, खेड, खेड वकील संघटना आणि सरसेनापती हंबीरराव मोहिते लॉ कॉलेज, राजगुरुनगर यांच्या संयुक्त हे शिबिर आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड येथील द्वितीय सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, एम.टी.खराडे हे होते. कार्यक्रमाला खेड वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. अतुल गोरडे तसेच मुख्यधापक मांजरे सर यांची प्रमुख उपस्थिती होती. या शिबिराचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये बालहक्क, बालसुरक्षा, वैयक्तिक सुरक्षितता आणि इंटरनेटच्या सुरक्षित वापराबाबत कायदेविषयक जागरूकता निर्माण करणे हा होता. यावेळी खेड येथील द्वितीय सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, एम.टी. खराडे यांनी आपल्या मनोगतात बालकांचे संरक्षण ही केवळ कायद्याची जबाबदारी नसून संपूर्ण समाजाचे कर्तव्य असल्याचे अधोरेखित केले. तर ॲड. राजेंद्र कुलकर्णी यांनी बालकांचे अधिकार, वैयक्तिक सुरक्षितता, ऑनलाइन सुरक्षितता तसेच तक्रार व अहवाल नोंदविण्याच्या प्रक्रियेविषयी मार्गदर्शन केले. सरसेनापती हंबीरराव मोहिते लॉ कॉलेजच्या विद्यार्थिनी प्रिया येळमाटे यांनी बालसंरक्षण या विषयावर, तर विद्यार्थिनी दीप्ती पोखरकर यांनी बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम (POCSO Act) याविषयी माहिती दिली. हा संपूर्ण उपक्रम हुतात्मा राजगुरु शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तथा मा.आमदार दिलीपराव मोहिते पाटील, संस्थेचे सचिव - प्राचार्य डॉ. शिवाजीराव मोहिते, खजिनदार सौ. सुरेखाताई डी. मोहिते पाटील तसेच विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किरण शिंदे यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडला. यावेळी महाविद्यालयाच्या मोफत विधी सहाय्य विभागाचे समन्वयक प्रा. संदीप तायडे, प्रा. ज्योती सांडभोर यांच्यासह विधी शाखेचे विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच जिल्हा परिषद शाळा सातरकवस्ती खेड येथील शिक्षक सुनील वाबळे, पवार मॅडम, मोर सर, लोंढे मॅडम उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लॉ कॉलेजच्या विद्यार्थिनी प्रिया येळमाटे यांनी केले. प्रस्ताविक वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. अतुल गोरडे यांनी केले.

अनौपचारिक सार्वजनिक वाहतूक क्षेत्रातील कामगारांच्या प्रश्नांना जागतिक व्यासपीठावर वाचा!

■ बँकॉक(दै. संध्या)



आंतरराष्ट्रीय परिवहन कामगार महासंघ (International Transport Workers' Federation – ITF) आणि ITF शी संलग्न कामगार संघटनांच्या सहभागातून अनौपचारिक सार्वजनिक वाहतूक क्षेत्रातील कामगारांची पहिली जागतिक परिषद थायलंडमधील बँकॉक येथे २६ ते २८ ऑक्टोबरदरम्यान आयोजित करण्यात आली होती. या महत्त्वपूर्ण आंतरराष्ट्रीय परिषदेत राष्ट्रीय मजदूर संघाचे अध्यक्ष श्री. सुनील शिंदे यांनी भारतातील कामगारांचे प्रतिनिधित्व केले.

या परिषदेत अनौपचारिक सार्वजनिक वाहतूक क्षेत्राचे वर्तमान आणि भविष्य, तसेच या क्षेत्रात काम करणाऱ्या लाखो कामगारांचे प्रश्न, त्यांचे हक्क आणि सामाजिक सुरक्षितता यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. जगभरातील शहरांपासून ग्रामीण भागांपर्यंत लाखो कामगार अनौपचारिक सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत कार्यरत असून, ते दररोज कोट्यवधी प्रवाशांना वाहतुकीची सुविधा उपलब्ध करून देतात. त्यामुळे या क्षेत्राचे अर्थव्यवस्थेतील आणि समाजातील योगदान अधोरेखित करण्यात आले.

या जागतिक परिषदेत ४३ हून अधिक देशांतील प्रतिनिधींनी सहभाग घेतला. विविध देशांतील सरकारी प्रतिनिधी, नियोक्ते, संशोधक, कामगार संघटनांचे प्रतिनिधी आणि विद्यापीठांतील तज्ज्ञांनी या क्षेत्रातील आव्हाने आणि भविष्यातील संधींवर विचारमंथन केले. अनौपचारिक सार्वजनिक वाहतूक क्षेत्राचे विद्युत वाहनांसारख्या आधुनिक वाहतूक पर्यायांकडे होणारे संक्रमण, त्यातून निर्माण होणाऱ्या पर्यायी रोजगाराच्या संधी, प्रवाशांची सुरक्षितता, कामगारांची अधिकृत मान्यता, सामाजिक सुरक्षा, वैद्यकीय सुविधा, कामाचे तास तसेच व्यावसायिक आरोग्य आणि सुरक्षितता या महत्त्वाच्या विषयांवर परिषदेत चर्चा झाली. या परिषदेत श्री. सुनील शिंदे यांनी अनौपचारिक वाहतूक क्षेत्रातील कामगारांच्या विविध समस्यांकडे आंतरराष्ट्रीय प्रतिनिधींचे लक्ष वेधले. या क्षेत्रात होत असलेली प्रगती आणि त्याचे महत्त्व मान्य करतानाच, या प्रगतीमध्ये कामगारांचा सन्मान आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षण होणे तितकेच आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. अनौपचारिक वाहतूक क्षेत्रातील कामगारांना केवळ कर्मचारी म्हणून न पाहता, वाहतूक व्यवस्थेच्या विकासातील महत्त्वाचे भागीदार म्हणून मान्यता मिळाली पाहिजे. त्यांना सन्मानाची वागणूक, योग्य कामाची परिस्थिती, सामाजिक सुरक्षा, वैद्यकीय सुविधा आणि सुरक्षित रोजगार मिळणे आवश्यक आहे, अशी भूमिका या परिषदेत मांडण्यात आली. परिषदेच्या निमित्ताने श्री. सुनील शिंदे यांनी भारत सरकारच्या नीती आयोगाचे श्री. ओ. पी. अग्रवाल यांच्याशीही संवाद साधला आणि अनौपचारिक सार्वजनिक वाहतूक क्षेत्राशी संबंधित विविध मुद्द्यांवर चर्चा केली.

'यादे' मालिकेसाठी इक्बाल खानची खास मेहनत स्त्रीसुलभ आवाजासाठी केले व्हॉईस एक्सरसाइज!

■ पुणे (दै. संध्या)

सोनी सबच्या यादे मालिकेत डॉ. देवच्या कल्लारी गावातील प्रवासातून हलक्याफुलक्या प्रसंगांसोबतच वेगळ्या वैद्यकीय प्रकरणांचीही मांडणी केली जाते. कल्लारीमधील आपल्या प्रवासात पुढे जात असताना, डॉ. देव (इक्बाल खान) एका कठीण परिस्थितीचा सामना करतो, जेव्हा एका गर्भवती गावकरी महिलेच्या संदर्भातील आपत्कालीन प्रसंग त्याच्यासमोर उभा राहतो. रुग्ण मिश्रीचा जीव वाचवण्याच्या आड ही परिस्थिती येऊ नये म्हणून, डॉ. देव एक अनोखी योजना आखतो आणि स्त्रीशक्तीचा संचार झालेल्या व्यक्तीचे रूप धारण करतो. महिलांच्या विभागात प्रवेश मिळावा यासाठी गावकऱ्यांना पटवून देण्यासाठी तो अगदी टोकाची पावले उचलतो. हा प्रसंग पडद्यावर साकारण्यासाठी इक्बालला त्याच्या नेहमीच्या अभिनयशैलीच्या चौकटीबाहेर जाऊन आवाजातील बदलांवर विशेष मेहनत घ्यावी लागली. आपल्या आवाजात स्त्रीसुलभ भाव आणण्यासाठी त्याने विशिष्ट व्हॉईस एक्सरसाइजचा सराव केला. तसेच, त्याचे



सादरीकरण विश्वासार्ह वाटावे यासाठी त्याने आवाजाची पट्टी, टोन आणि हावभाव यांकडे बारकाईने लक्ष दिले. या प्रसंगामुळे त्याला अभिनयाची एक वेगळी बाजू अनुभवण्याची संधी मिळाली, कारण गावकऱ्यांचा विरोध दूर करून गरजू व्यक्तीची मदत करण्यासाठी डॉ. देव आपल्या प्रसंगावधानाचा वापर करतो. या प्रसंगाबद्दल बोलताना इक्बाल खान म्हणाला, "एक अभिनेता म्हणून हा माझ्यासाठी खूपच वेगळा अनुभव होता, कारण डॉ. देवची भूमिका साकारताना मी सहसा ज्यांचा शोध घेत नाही अशा अभिनयाच्या काही पैलूंवर मला काम करावे लागले.

राजयोगी ब्रह्माकुमार दशरथभाई भागवत यांना पुरस्कार जाहीर

■ नारायणगाव (दै. संध्या)



आध्यात्मिक नेतृत्व, राजयोग ध्यानाचा प्रसार तसेच समाजात शांती, सद्भावना आणि आध्यात्मिक ज्ञानाचा प्रसार करण्यासाठी उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल राजयोगी ब्रह्माकुमार दशरथभाई भागवत यांना Winners Book of World Records तर्फे प्रतिष्ठेचा 'National Spiritual Leadership Award 2026' प्रदान करण्यात येणार आहे. येत्या ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी पुण्यातील जगदंबा भवन येथे Winners Book of World Records च्या अध्यक्षा मिस इंडिया डॉ. ईशा अग्रवाल यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करून त्यांचा गौरव करण्यात येणार आहे.

आध्यात्मिक सक्षमीकरण, मानवी मूल्यांचे संवर्धन आणि मानवतेच्या उन्नतीसाठी केलेल्या समर्पित कार्याची दखल घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. राजयोग ध्यानाच्या माध्यमातून मनःशांती, सकारात्मक विचारसरणी आणि आध्यात्मिक जागृतीचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याच्या त्यांच्या कार्याचे या पुरस्काराद्वारे कौतुक करण्यात येणार आहे.

Winners Book of World Records ही संस्था समाजाला प्रेरणा देणाऱ्या आणि मानवकल्याणासाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा गौरव करते. याच उपक्रमांतर्गत ब्रह्माकुमार दशरथभाई यांच्या आध्यात्मिक नेतृत्वाचा आणि सेवाभावी कार्याचा सन्मान करण्यात येत आहे. संस्थेच्या अध्यक्षा मिस इंडिया डॉ. ईशा अग्रवाल यांनी ब्रह्माकुमार दशरथभाई यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील आध्यात्मिक सेवाकार्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.

जिजामाता विद्यालयात 'सुरक्षित बचपन अभियानांतर्गत' कायदेविषयक मार्गदर्शन



■ जेजुरी (दै. संध्या)

येथील जिजामाता हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येथे तालुका विधी सेवा समिती, सासवड यांच्या वतीने 'सुरक्षित बचपन अभियान' अंतर्गत मोफत कायदेविषयक मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन गुरुवार, दिनांक २९ ऑक्टोबर रोजी करण्यात आले. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना बालकांचे हक्क, कायदेविषयक तरतुदी, नागरिकांचे अधिकार आणि सायबर सुरक्षेबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन करण्यात आले.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे राज्य सचिव ,राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त प्राचार्य नंदकुमार सागर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. या कार्यशाळेत ॲड. विश्वास पानसे, ॲड. सुभाष नाझीरकर, ॲड. गणेश लेंडे आणि वर्षा सुतार यांनी विद्यार्थ्यांना कायद्याची ओळख करून देण्याबरोबरच समाजात कायदेविषयक जनजागृती निर्माण करणे आणि नागरिकांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून दिली. कार्यक्रमात 'मेरा बचपन, मेरा अधिकार', 'कानून जाणो, बचपन बचाओ' आणि 'सुरक्षित क्लिक, सुरक्षित बचपन' या विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. बालकांच्या संरक्षणासाठी असलेल्या कायद्यांची माहिती, बालकांचे मूलभूत हक्क, अन्यायाविरुद्ध दाद मागण्याचे मार्ग आणि कायद्याचे महत्त्व याविषयी विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सागर चव्हाण यांनी केले, तर सोनबा दुर्गाडे यांनी आभार मानले.

सुंदरजीज् ग्लोबल अकॅडेमियाच्या समावेशक शिक्षणाच्या ३० वर्षांच्या वाटचालीचा गौरव

'दान नको, रोजगाराच्या संधी हव्या'; पुण्याला 'न्यूरोडायव्हर्सिटी सिटी' बनवण्याचे ध्येय

■ पुणे (दै. संध्या)



विशेष गरजा असलेल्या आणि न्यूरोविविध मुलांच्या शिक्षण,सक्षमीकरण व स्वावलंबनासाठी कार्यरत सुंदरजीज् ग्लोबल अकॅडेमियाने (एसजीए)समावेशक शिक्षणाच्या क्षेत्रातील ३० वर्षांचा प्रवास 'बियॉन्ड द स्पॉटलाइट' या विशेष कार्यक्रमाद्वारे साजरा केला.


विमाननगर येथील सिम्बायोसिस ईशान्य ऑडिटोरियममध्ये झालेल्या कार्यक्रमात शिक्षण, समावेशकता, क्रीडा आणि उद्योग क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या ३० परिवर्तनकर्त्यांचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाला डीएचआय अँड कॉड्स फाउंडेशनचे संस्थापक डॉ. मुफ्फझल लकडावाला आणि सोलकोरच्या संस्थापक प्रियांका कौल लकडावाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसह विद्यार्थी, पालक आणि मान्यवरांनी सहभाग घेतला. यावेळी संस्थेच्या तीन दशकांच्या वाटचालीवर आधारित चित्रफीत दाखवण्यात आली. मुलांची क्षमता, आवड आणि वैयक्तिक गरजांनुसार शिक्षण देण्याबरोबरच त्यांच्यात कौशल्यविकास आणि स्वावलंबनाची भावना निर्माण करण्यावर भर देण्यात आला. संस्थेच्या सहसंस्थापक मसरत तवावाला यांनी पुढील पाच वर्षांत समावेशक शिक्षण देणाऱ्या तीन नवीन शाळा आणि दोन व्यावसायिक प्रशिक्षण केंद्रे सुरू करण्याचे नियोजन असल्याचे सांगितले. विशेष गरजा असलेल्या तरुणांना उद्योग आणि कॉर्पोरेट क्षेत्राने रोजगाराच्या अर्थपूर्ण संधी उपलब्ध करून द्याव्यात, असे आवाहन करताना त्या म्हणाल्या, "आम्हाला दान नको, रोजगाराच्या संधी हव्या आहेत." पुण्याला देशातील पहिले 'न्यूरोडायव्हर्सिटी सिटी' बनवण्याचे संस्थेचे ध्येय असून, न्यूरोविविध व्यक्तींना शिक्षण, सार्वजनिक सुविधा आणि रोजगाराच्या समान संधी मिळाव्यात, यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत. कार्यक्रमातील संवाद सत्रात डॉ. मुफ्फझल लकडावाला आणि प्रियांका कौल लकडावाला यांनी मुलांचे मूल्यमापन केवळ शैक्षणिक गुणांवर न करता त्यांची क्षमता,आवड आणि कौशल्ये ओळखण्याचे महत्त्व अधोरेखित केले.न्यूरोविविध मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी सुरक्षित व सर्वसमावेशक वातावरण निर्माण करून त्यांना समाजात सन्मानाने सहभागी होण्याची संधी द्यावी,असे आवाहन केले. समावेशक शिक्षणातून प्रत्येक व्यक्तीला स्वावलंबी आणि सन्मानाने जगण्याची संधी मिळावी.



दैनिक संध्या
निःपक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
शनिवार, दि. ३१ ऑक्टोबर २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews



थोडक्यात पण महत्वाचे



दिवाळीनिमित्त शरदचंद्र पतसंस्थेकडून भेटवस्तू वाटप

नारायणगाव : दैनिक संध्या

दिवाळी सणाचा आनंद सभासदांसोबत साजरा करण्याच्या उद्देशाने राजुरी येथील शरदचंद्र नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने सभासदांना दिवाळी भेटवस्तूंचे वाटप करण्यात आले आहे. संपूर्ण महाराष्ट्र कार्यक्षेत्र असलेल्या या पतसंस्थेच्या ओतूर, नारायणगाव शाखेसह संस्थेच्या सर्व १७ शाखांमध्ये या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला असून, राजुरी येथील मुख्य कार्यालयासह संस्थेच्या सर्व शाखांमध्ये हा उपक्रम राबविण्यात येत आहे. संस्थेचे अध्यक्ष एम. डी. घंगाळे, उपाध्यक्ष राजेंद्र औटी, सचिव दत्तात्रय गंधट, खजिनदार भिमाजी मालुस्कर, मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास घंगाळे आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी विजय अनंतराव गाडगे यांनी याबाबत माहिती दिली. ओतूर शाखेत आयोजित कार्यक्रमात शाखेचे सल्लागार अजित पानसरे, शाखा व्यवस्थापिका रूपाली घंगाळे, भारत राऊत आणि सल्लागार शांताराम नलावडे व नारायणगाव शाखेतील सल्लागार अंजलीताई खैरे, मंगेश पाटे, संजय अडसरे, महेश शिंदे,वैभव सोनवणे, अभिषेक भुजबळ व शाखा व्यवस्थापक प्रियांका पिंगळे मॅडम यांच्या हस्ते सभासदांना भेटवस्तूंचे वाटप करण्यात आले. यावेळी सभासदांनी संस्थेच्या या उपक्रमाचे स्वागत केले. शरदचंद्र नागरी सहकारी पतसंस्थेच्या नारायणगाव शाखेच्या वतीनेही सभासदांना दिवाळीनिमित्त भेटवस्तूंचे वाटप करण्यात येत आहे. संस्थेच्या या उपक्रमामुळे सभासदांमध्ये आनंदाचे वातावरण असून, दिवाळीच्या सणानिमित्त संस्थेने सभासदांशी जिव्हाळ्याचे नाते अधिक दृढ करण्याचा प्रयत्न केला आहे. या कार्यक्रमाला ठिकेकरवाडीचे माजी सरपंच पांडुरंग ठिकेकर, विकास महाराज शिरसाठ, रखमाजी नलावडे, ओतूर जेष्ठ नागरिक संघाचे माजी अध्यक्ष भिवाजी माळवे, प्रकाश पानसरे, संदेश साळुंके, अभिषेक शिंदे यांच्यासह सभासद उपस्थित होते.तसेच पतसंस्थेचे कर्मचारी व अधिकारी यांनी कार्यक्रमाच्या आयोजनासाठी सहकार्य केले.

बारामती तालुक्यातील पणदरे जवळ शॉर्टसर्किटमुळे बारा एकर ऊस जळून खाक

■ माळेगाव कारखान्याचे उपाध्यक्ष नितीनकुमार शेंडे व संचालक योगेश भैय्या जगताप यांची शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानीची पाहणी

बारामती : दैनिक संध्या

बारामती तालुक्यातील माळेगाव साखर कारखाना कार्यक्षेत्रात पणदरे गटातील धुमाळवाडी येथे अचानक विजेच्या घर्षणामुळे पाच ते सहा शेतकऱ्यांच्या तब्बल बारा एकर ऊस व त्या सोबतच ठिबक सिंचन संच जळून खाक झाला.यामुळे अनेक शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले. श्री.कोकरे यांच्या उसाची तोडणी चालू असताना मंगळवारी दुपारी शॉर्टसर्किटमुळे अचानकपणे आग लागली,त्या सोबतच शेजारील प्रदीप काशिनाथ जगताप यांचा एक एकर ऊस व ठिबक सिंचन संच तसेच शिवाजी मारुती कोकरे यांचा एक एकर ऊस व ठिबक सिंचन संच,त्याबरोबर बाळासाहेब वाघमोडे यांचा तीन एकर ऊस व ठिबकसिंचन संच आणि लोटकरे यांचा पाच ते सहा एकर असा सर्वांचा मिळून बारा एकर ऊस तोडणीच्या पूर्वीच शॉर्ट सर्किट मुळे जळून भस्मसात झाला.यावेळी उसाला लागलेल्या आगीमुळे प्रचंड धुराचे लोट आस्मानात उसळत होते,धुराचे लोट आकाशात दिसत होते.दरम्यान तातडीने माळेगाव कारखान्याने आपल्याकडील यंत्रणा तातडीने घटनास्थळी पाठवून आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला.यावेळी कारखान्याचे कार्यतत्पर उपाध्यक्ष नितीनदादा शेंडे,कारखान्याचे दुसरे अभ्यासू संचालक योगेशभय्या जगताप यांनी शेतकऱ्यांच्या अचानक जळालेल्या उसाची प्रत्यक्ष पाहणी केली असता,या उसाला ताबडतोब माळेगाव कारखान्याची यंत्रणा पाठवून ऊस गळपासाठी तोडणी करण्याच्या कारखान्याला तातडीने सुचना देण्यात आल्या व ऊस तोडणीस सुरुवात करण्यात आली आणि ऊस साखर कारखान्यावर आणला.



तंत्रज्ञान व संशोधन क्षेत्रात भारत आत्मनिर्भर व्हावा: प्रसन्न दातार

■ पुणे विद्यार्थी गृहाच्या अभियांत्रिकी महाविद्यालयात आयोजित तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचा समारोप

पुणे : दैनिक संध्या

"शाश्वत ऊर्जा ही येत्या काळाची गरज असून त्याची निर्मिती कशी वाढेल याकडे लक्ष द्यायला हवे. भारताने विविध तांत्रिक गोष्टींची आयात कमी करून देशांतर्गत संशोधन आणि नवोपक्रमांना प्रोत्साहन द्यायला हवे. तांत्रिक आत्मनिर्भरता ही सध्या देशासाठी सगळ्यात महत्त्वाची गोष्ट असून त्याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे", असे प्रतिपादन अतिरिक्त सीमाशुल्क आयुक्त व महाविद्यालयाच्या यंत्र अभियांत्रिकी विभागाचे माजी विद्यार्थी प्रसन्न दातार यांनी व्यक्त केले. पुणे विद्यार्थी गृहाच्या अभियांत्रिकी, तंत्रज्ञान व व्यवस्थापन महाविद्यालयात आयोजित 'इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन अॅडव्हान्सेस इन इंजिनिअरिंग, टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट – २०२६' या तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेच्या समारोपावेळी ते बोलत होते. पुणे विद्यार्थी गृहाचे संचालक सुनील रेडेकर, प्रा. राजेंद्र कडुसकर, प्राचार्य डॉ. संदीप पाटील, परिषदेचे संयोजक डॉ. मनमोहन भूमकर व डॉ. रवींद्र एदलाबादकर, परिषदेचे आयोजक डॉ. गणेश मोरे आणि डॉ. शुभांगी गोंदाणे उपस्थित होते. तसेच या परिषदेला संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले. प्रसन्न दातार म्हणाले, संशोधनातून निर्माण होणाऱ्या नाविन्यपूर्ण संकल्पनांचे पेटंट घेणे आणि बौद्धिक संपदा हक्कांचे संरक्षण करणे आवश्यक आहे. तसेच संरक्षण क्षेत्राशी संबंधित संशोधनासाठी परिषदेमध्ये स्वतंत्र संशोधन विभाग समाविष्ट करण्याचे आवाहनही त्यांनी केले. या परिषदेसाठी संशोधन निबंध मागवण्यात आले होते, त्याला संशोधकांनी मोठा प्रतिसाद दिला. त्यातील निवडक १५६ संशोधन निबंधांचे पुस्तक प्रकाशित करण्यात आले आहे. यातील उत्कृष्ट संशोधन निबंधांपैकी सर्वोत्कृष्ट संशोधन निबंधांना यावेळी विशेष पुरस्कार जाहीर करण्यात आले. परिषदेच्या समारोप सत्रात सहभागी संशोधकांनी आपले अभिप्राय व अनुभव व्यक्त केले. अभियांत्रिकी, तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन क्षेत्रातील संशोधन, नवोपक्रम, ज्ञानाची देवाणघेवाण आणि आंतरराष्ट्रीय सहकार्याला प्रोत्साहन देणारी ही परिषद यशस्वीरीत्या झाली.



बनावट विदेशी मद्याचे रॅकेट उघडकीस

राज्य उत्पादन शुल्क विभागाची धडक कारवाई, ३ जण ताब्यात, ११ लाख ५५ हजार ३६० रुपयांचा मुद्देमाल जप्त

■ नारायणगाव (दै. संध्या)

जुन्नर तालुक्यातील बेल्हे गावच्या हद्दीत बांगरवाडी येथे राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने छापा टाकून बेकायदेशीररित्या देशी दारू व विदेशी मद्यसाठा करणाऱ्या ३ इसमांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून ११ लाख ५५ हजार ३६० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क निरीक्षक शरद जाधव यांनी दिली. सदरच्या कारवाईत सचिन गणपत गाडगे (वय ४०), ताहीर युसूफ शेख (वय ४३) दोघेही रा. निमगाव सावा ता. जुन्नर जि. पुणे, सागर रामदास बोरुडे (वय २७) वर्ष रा.आळकुटी ता. पारनेर जि. अहमदनगर उत्पादन शुल्क विभागाने दिलेल्या माहितीनुसार जुन्नर तालुक्यातील बेल्हे येथील बांगरवाडी वस्तीमध्ये बनावट देशी विदेशी दारूचा मद्यसाठा असल्याची माहिती खबऱ्यामार्फत मिळाली. त्यानुसार राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने ३० ऑक्टोबर रोजी या ठिकाणी छापा टाकला असता २४ हजार किमतीच्या रॉयल स्टॅग व्हिस्कीच्या १८० ml च्या ९६ सिलबंद बनावट मद्याच्या बाटल्या तसेच देशी दारू जीएम संत्रा १८० ml च्या ५०४० सीलबंद बाटल्या अंदाजे किंमत ४ लाख ३ हजार दोनशे असा एकूण ४ लाख २७ हजार दोनशे रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेऊन आरोपींकडे अधिक चौकशी केली. यावेळी मौजे अळकुटी ता. पारनेर, जि. अहिल्यानगर येथून ३ लाख ४८ हजार रु किमतीच्या बनावट रॉयल स्टॅग व्हिस्कीच्या १८० ml च्या १३९२ सीलबंद बाटल्या तसेच बनावट इम्पेरियल ब्ल्यू व्हिस्कीच्या ३ लाख ८० हजार १६० रुपये किमतीच्या १७२८ सीलबंद बाटल्या असा ७ लाख २८ हजार १६० रुपये किमतीचा मुद्दमाल हस्तगत करण्यात आला. अशाप्रकारे दोन्ही ठिकाणी केलेल्या कारवाईतून एकूण ११ लाख ५५ हजार ३६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदरची कारवाई राज्य उत्पादन शुल्क आयुक्त राजेंद्र देशमुख, सह आयुक्त प्रसाद सुर्वे, विभागीय उपायुक्त सागर धोमकर, अधीक्षक रविकिरण कोले यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक शरद जाधव, दुय्यम निरीक्षक सौरव आवटे, समृद्धी निकम, जवान गणेश वाव्हळ, निलेश केदार, दिलीप केकरे, प्रियंका झांजरे, सुनील कोकणे यांच्या पथकाने केली.

शिरूर नगरपरिषदेच्या राजकारणात मोठी उलथापालथ!



■ शिरूर (दै. संध्या)

शिरूर नगरपरिषदेच्या राजकारणात आज (दि. ३० ऑक्टोबर) मोठी राजकीय घडामोड घडली. नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष मितेश गादिया यांच्याविरोधात मांडण्यात आलेला अविश्वास ठराव विशेष सर्वसाधारण सभेत बहुमताने मंजूर करण्यात आला. त्यामुळे मितेश गादिया यांना उपनगराध्यक्षपदावरून हटविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे शिरूरच्या स्थानिक राजकारणात नव्या राजकीय समीकरणांची चर्चा सुरू झाली आहे. नगराध्यक्षा ऐश्वर्या अभिजित पाचर्णे यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी सकाळी ११ वाजता रसिकभाऊ धारीवाल सभागृहात ही विशेष सर्वसाधारण सभा पार पडली. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ५५-१अ अन्वये ही सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेच्या सुरुवातीला नगरपरिषदेच्या २८ सदस्यांपैकी २७ सदस्य उपस्थित होते. मात्र, उपनगराध्यक्ष मितेश गादिया यांच्यासह सहा सदस्यांनी सभात्याग केला. त्यानंतर अविश्वास ठरावाच्या बाजूने मतदान प्रक्रिया पार पडली. यामध्ये ठरावाच्या समर्थनार्थ सर्वाधिक २० मते पडल्याने अविश्वास ठराव बहुमताने मंजूर झाल्याचे नगराध्यक्षा ऐश्वर्या पाचर्णे यांनी जाहीर केले. विशेष म्हणजे, नगरपरिषदेतील १८ नगरसेवकांसह संगिता मल्लाव यांनी उपनगराध्यक्षांच्या कामकाजाबाबत असमाधान व्यक्त करत अविश्वास ठराव आणण्यासाठी २६ ऑक्टोबर रोजी नगराध्यक्षांना नोटीस दिली होती. त्यानुसार अवघ्या चार दिवसांत विशेष सभा घेण्यात आली. या घडामोडीमुळे शिरूर नगरपरिषदेतील सत्तेच्या राजकारणाला नवे वळण मिळाले असून, आता उपनगराध्यक्षपदाची पुढील राजकीय गणिते काय असणार, याकडे शिरूरकरांचे लक्ष लागले आहे.

■ उपनगराध्यक्ष मितेश गादिया यांच्याविरोधातील अविश्वास ठराव बहुमताने मंजूर

■ विशेष सभेत २० नगरसेवकांचे समर्थन; मितेश गादिया यांना उपनगराध्यक्षपदावरून हटविण्याचा निर्णय



सभासदांना भेटवस्तू व दिनदर्शिका वाटपाचा शुभारंभ!

■ ओतूर (दै. संध्या)

ओतूर (ता. जुन्नर) येथील मांडवी किनारा नागरी सहकारी पतसंस्थेने सहकार क्षेत्रात आर्थिक प्रगतीची यशस्वी वाटचाल सुरू ठेवली आहे. संस्थेच्या ठेवींचा आकडा ९१ कोटी १० लाख रुपयांवर पोहोचला असून, सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात १०० कोटी रुपयांच्या ठेवींचे उद्दिष्ट संस्थेने निश्चित केले आहे. दरम्यान, दिवाळीच्या पार्श्वभूमीवर संस्थेच्या सभासदांना भेटवस्तू व दिनदर्शिकेचे वाटप गुरुवारी (दि. २९ ऑक्टोबर) संस्थेच्या मुख्य कार्यालयात उत्साहात करण्यात आले. या भेटवस्तू व दिनदर्शिका वाटपाचा उपक्रम दि. २९ ऑक्टोबर ते ७ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत सुरू राहणार असल्याची माहिती संस्थेचे मुख्य अधिकारी योगेश तांबे यांनी दिली. सभासदांचा विश्वास आणि सहकार्याच्या बळावर संस्थेने अल्पावधीत आर्थिक क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. केवळ आर्थिक व्यवहारांपुरते मर्यादित न राहता सभासदांशी जिव्हाळ्याचे नाते जपण्याच्या उद्देशाने दरवर्षी दिवाळीनिमित्त भेटवस्तू व दिनदर्शिका वाटपाचा उपक्रम राबविण्यात येतो. यंदाही या उपक्रमाला सभासदांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. संस्थेच्या आर्थिक प्रगतीविषयी माहिती देताना संस्थापक अध्यक्ष संभाजी तांबे यांनी सांगितले की, संस्थेचे सध्या ६ हजार ७७१ सभासद आहेत. संस्थेचे भागभांडवल ४ कोटी ६५ लाख रुपये, निधी ४ कोटी १४ लाख रुपये, ठेवी ९१ कोटी १० लाख रुपये, कर्जवाटप ६१ कोटी ३५ लाख रुपये, गुंतवणूक ३० कोटी रुपये, तर खेळते भागभांडवल १०३ कोटी रुपये इतके आहे.

या आर्थिक प्रगतीच्या जोरावर सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात १०० कोटी रुपयांच्या ठेवींचा टप्पा गाठण्याचे उद्दिष्ट संस्थेने ठेवले आहे. सभासदांचा वाढता विश्वास, पारदर्शक आर्थिक व्यवहार आणि संचालक मंडळाच्या नियोजनबद्ध कामकाजाच्या माध्यमातून हे उद्दिष्ट साध्य करण्याचा संस्थेचा मानस आहे. मान्यवरांच्या उपस्थितीत या कार्यक्रमाला संस्थापक अध्यक्ष संभाजी तांबे, उपाध्यक्ष गणपत डुंबरे, सचिव आशिष शहा, संचालक बबन तांबे, विश्वास तांबे, अॅड. कैलास पानसरे, सिताराम ढमाले, विठ्ठल डुंबरे, डॉ. संजय वेताळ, सतीश गिते, जयसिंग काळे, संचालिका सुशीला तांबे, मंजुषा डुंबरे, तज्ज्ञ संचालक डॉ.भरत घोलप, विश्वास इसकांडे,विशाल बनकर,जिल्हा परिषद सदस्या डॉ. छाया तांबे, पंचायत समिती सदस्य प्रशांत डुंबरे, सल्लागार तुषार डुंबरे आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच सभासद दिलीप डुंबरे, विठ्ठल डुंबरे, दादाभाऊ पानसरे, सुभाष शेटे, भरत ठीकेकर, शुभम ढोबळे, सिताराम रोकडे, शांताराम शिंदे,संपत आरोटे यांच्यासह संस्थेचे सभासद व ठेवीदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सभासदांचा विश्वास हीच संस्थेची खरी ताकद

दिवाळीच्या निमित्ताने सभासदांना भेटवस्तू देऊन त्यांच्याशी असलेले जिव्हाळ्याचे नाते अधिक दृढ करण्याचा संस्थेचा प्रयत्न आहे. आर्थिक प्रगतीबरोबरच सभासदांचे हित,विश्वास आणि सहकाराची भावना जपण्यावर संस्थेचा भर आहे. ९१ कोटींच्या ठेवींचा टप्पा पार केल्यानंतर आता १०० कोटींच्या उद्दिष्टाकडे संस्थेने वाटचाल सुरू केली असून, या प्रगतीमुळे ओतूर परिसरातील सहकार क्षेत्रात मांडवी किनारा नागरी सहकारी पतसंस्थेची चर्चा होत आहे.

सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सतर्फे आज शनिवारी (ता. ३१)

'कारोबार ९.० - सूर्यभारत जननेक्स्ट स्टार्टअप फेस्ट'चे आयोजन

युनिकॉर्न कंपन्यांचा व्यावसायिक प्रवास, नवकल्पना आणि उद्योजकीय कौशल्यांचे विद्यार्थ्यांकडून सादरीकरण

■ पुणे (दै. संध्या)

विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेची प्रेरणा, नावीन्यपूर्ण व्यावसायिक संकल्पनांना व्यासपीठ देण्यासह स्टार्टअप विश्वाची ओळख करून देण्याच्या उद्देशाने सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सतर्फे उद्या, शनिवारी (ता. ३१) 'कारोबार ९.० - सूर्यभारत जननेक्स्ट स्टार्टअप फेस्ट'चे आयोजन करण्यात आले आहे. बावधन येथील 'सूर्यदत्त'च्या कॅम्पसमध्ये सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत हा महोत्सव होणार आहे, अशी माहिती 'सूर्यदत्त'चे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांनी पत्रकार परिषदेत दिली. प्रसंगी उपाध्यक्षा व सचिव सुषमा चोरडिया, मुख्य कार्यकारी अधिकारी अक्षित कुशल, अधिष्ठाता प्रा. डॉ. प्रतीक्षा वाबळे, सूर्यदत्त कॉलेज ऑफ हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट अँड ट्रॅव्हल टुरिझमच्या विभागप्रमुख रसिका गुमास्ते आदी उपस्थित होते. प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया म्हणाले, "या



आंतरमहाविद्यालयीन व्यावसायिक प्रदर्शनात विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी भारतीय युनिकॉर्न कंपन्यांचा यशस्वी प्रवास, त्यांची व्यवसाय प्रारूपे, नावीन्यपूर्ण संकल्पना, विपणन धोरणे, गुंतवणुकीचा प्रवास आणि व्यवसाय विस्ताराच्या रणनीती सादर करणार आहेत. विविध आकर्षक स्टॉल्स, व्यावसायिक प्रात्यक्षिके आणि 'स्टॉल टू सेल' या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना व्यवसायातील संकल्पना प्रत्यक्षात उतरविण्याची संधी मिळणार आहे. व्यवस्थापन आणि उद्योजकतेचे शिक्षण केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष व्यावसायिक जगाचा अनुभव मिळावा, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. उत्पादनाचे सादरीकरण, विपणन, विक्री, ग्राहकांशी संवाद आणि व्यवसाय व्यवस्थापन या विविध बाबींचा अनुभव विद्यार्थ्यांना या प्रदर्शनातून घेता येणार आहे. त्याचबरोबर व्यावसायिक निर्णयक्षमता, नेतृत्वगुण, सर्जनशीलता आणि संघभावना विकसित करण्यावर भर देण्यात येणार आहे." युनिकॉर्न कंपन्यांच्या यशस्वी वाटचालीचा अभ्यास करताना स्टार्टअप उभारणीसाठी आवश्यक असलेले नियोजन, भांडवल उभारणी, बाजारपेठेची निवड आणि व्यवसायविस्तार यांविषयी विद्यार्थ्यांना समजून घेता येणार आहे. नव्या व्यावसायिक संकल्पना प्रत्यक्षात आणताना येणारी आव्हाने आणि उपलब्ध संधी यांचीही ओळख या माध्यमातून होणार आहे. 'विकसित भारत @ २०४७' या राष्ट्रीय संकल्पनेशी सुसंगत असलेला हा महोत्सव युवकांमध्ये उद्योजकता, नवोन्मेष, कौशल्यविकास आणि रोजगारनिर्मितीची मानसिकता विकसित करण्यास प्रोत्साहन देणार आहे. शिक्षण, उद्योग, संशोधन आणि उद्योजकता यांची सांगड घालण्याच्या सूर्यभारत ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजच्या व्यापक दृष्टिकोनाशीही हा उपक्रम सुसंगत आहे, असे डॉ. प्रतीक्षा वाबळे यांनी नमूद केले.

विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला वाव देण्याबरोबरच त्यांच्यातील उद्योजकीय क्षमता विकसित करणे आणि भविष्यातील व्यावसायिक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी त्यांना तयार करणे, हा या महोत्सवामागील महत्त्वाचा हेतू आहे. या प्रदर्शनाला विद्यार्थी, पालक, उद्योजक, व्यावसायिक आणि नागरिकांनी भेट देऊन विद्यार्थ्यांच्या नावीन्यपूर्ण संकल्पना व उद्योजकीय कौशल्यांचा अनुभव घ्यावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.